| लातूर | वर्ष ३४ वे | अंक २९२ वा | शुक्रवार, दिनांक १३ फेब्रुवारी २०२६ | पृष्ठे ६ | किंमत १ रू. RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

## फक्त रणवीरच नाही तर त्याच्या संपूर्ण स्टाफला... बिश्नोई गँगनं दिली नवी धमकी


**मुंबई/प्रतिनिधी:** बॉलीवूड अभिनेता रणवीर सिंह याला (दि. १३) पुन्हा एकदा बिश्नोई गँगकडून धमकी मिळाली आहे. या धमकीत त्यांनी ते फक्त रणवीर सिंहलाच नाही तर पूर्ण स्टाफला देखील टार्गेट करणार असल्याचं म्हटलं आहे. बिश्नोई गँगशी संबंधित असलेल्या एका अनोळखी व्यक्तीनं याबाबतची व्हॉईस नोट पाठवली आहे. यबाबतची माहिती हिंदूस्तान टाईम्सनं दिली आहे.

या व्हॉईस नोटमध्ये संबंधित व्यक्ती हा, 'शब्द न पाळण्याची शिक्षा काय असते हे तुला आता सांगणार.' असं म्हणताना दिसत आहे. याचबरोबर संबंधित अनोळखी व्यक्ती हा रोहित शेट्टीचा देखील उल्लेख करताना दिसतो. तो म्हणतो, 'लाईनवर या जर आला नाही तर मग पाहा आम्ही लोक काय करू शकतो ते.'

रणवीर सिंह आणि दीपिका पदुकोन यांना एका दिवसापूर्वीच धमकी आली होती. त्यानंतर त्यांनी आपली सुरक्षा वाढवली होती. मुंबईतील त्यांच्या घराबाहेर देखील सुरक्षा वाढवण्यात आली होती. दादर पोलिस ठाण्याला हाऊसिंग कॉम्पेक्सने एक अधिकृत पत्र लिहिलं आहे. त्यानुसार रणवीर सिंह आणि दीपिका पदुकोण यांनी घराबाहेर शसस्त्र बंदोबस्त ठेवला आहे. दरम्यान, व्हॉईस नोट पाठवणार व्यक्ती हा रणवीर सिंह याला इजा पोहचवण्याऐवजी त्यांच्या स्टाफला इजा पोहचवणार असं देखील म्हणतोय. 'रणवीर सिंह तुला सल्ला द्यायला खूप आवडतं ना तू लोकांना पोलिस ठाण्यात जाऊन तक्रार देण्यास सांगतोस. ठीक आहे तू हे कर काही प्रॉब्लेम नाही.'

**कोण कधी येतं कधी जातं सर्व....**

धमकी देणारा अनोळखी व्यक्ती व्हॉईस नोटमध्ये पुढे म्हणतो, 'आता माझं ऐक. तुझ्या हाताखाली जे कोणी काम करत आहेत. मॅनेजर, स्टाफ सर्वांची डिटेल माहिती आमच्याकडे आहे. ते कुठं राहतात, ते कधी ऑफिसला येतात, ते केव्हा घरी जातात, त्यांचे कुटुंबीय कुठं राहतात. आमच्याकडे सर्व माहिती आहे. आम्ही तुला थेट काही सांगणार नाही. आम्ही त्यांना इजा पोहचवण्यास सुरूवात करू. त्यावेळी तुला अक्कल येईल.'



### नोंदणी व मुद्रांक विभागात 'गट-ड' संवर्गातील उमेदवारांची निवड यादी प्रसिद्ध

**लातूर/प्रतिनिधी:** नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गात २८४ पदे भरतीकरीता आय,बी,पी,एस. कंपनीमार्फत जुलै-२०२५ मध्ये ऑनलाईन परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्तीच्या अनुषंगाने समुपदेशनाकरीता बोलाविण्यात येणार आहे. याबाबत विभागाच्या www.igrmaharashtra.gov.in या संकेतस्थळावर स्थळ व दिनांक लवकरच प्रसिद्ध करण्यात येईल, असे नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक रवींद्र बिनवडे यांनी कळविले आहे.

नोंदणी व मुद्रांक विभागात शिपाई 'गट-ड' संवर्गासाठीच्या परीक्षेचा निकाल २० ऑगस्ट २०२५ रोजी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला होता. उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांमधून सामाजिक व समांतर आरक्षणानुसार आणि गुणवत्तेनुसार उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी पूर्ण करण्यात आली आहे.

उमेदवारांच्या कागदपत्र पडताळणीअंती निवड यादी, प्रतिक्षा यादी, निवडीसाठी नकार दिलेल्या उमेदवारांची यादी, अपात्र उमेदवारांची यादी तसेच कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर उमेदवारांची यादी नोंदणी व मुद्रांक विभागाच्या संकेतस्थळावर १० फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असल्याचे विभागामार्फत कळविण्यात आले आहे.

## मंत्र्यांच्या दोन कर्मचाऱ्यांना लाच घेताना पकडले



**मुंबई/प्रतिनिधी:** राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते आणि राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांच्या मंत्रालयातील कार्यालयामध्ये लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) छापा टाकत दोन कर्मचाऱ्यांना ताब्यात घेतले. कार्यालयातील लिपिक राजेंद्र ढेरंग याने ५० हजार रुपयांची लाच मागितली आणि त्यातील ३५ हजार रुपये स्वीकारत असताना त्याला पकडण्यात आले. या सर्व घटनेवर आता मंत्री नरहरी झिरवाळ यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

नरहरी झिरवाळ सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईनंतर त्यांनी दिल्लीत माध्यमांशी संवाद साधत असताना आपली बाजू मांडली.

### तर मी राजीनामा देईन – नरहरी झिरवाळ

तुमच्यापर्यंत या प्रकरणाचे धागेदोरे येत असल्याचा आरोप विरोधक करत आहेत, असा प्रश्न विचारला असता मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले की, तसे जर माझ्यापर्यंत धागेदोरे येत असतील आणि ते सिद्ध होत असेल तर त्याची जबाबदारी घेण्यास मी तयार असेन. या भ्रष्टाचाराचे माझ्याशी संबंध असल्याचे सिद्ध झाले तर मी राजीनामा देईन, असेही मंत्री नरहरी झिरवाळ म्हणाले.

ते म्हणाले, मी दोन दिवसांपासून दिल्लीत आहे. काल जो काही प्रकार झाला, तो अतिशय चुकीचा होता. असे व्हायला नको होते. राजेंद्र ढेरंग हे लिपिक म्हणून काम करतात. सुनावणीचे कागदपत्र तयार करण्याचे काम त्यांच्याकडे आहे. ते मुळचे अन्न व नागरी पुरवठा विभागाचे कर्मचारी आहेत. त्यांना उसनवारीवर या विभागात घेतले होते. त्यांच्याकडून हा प्रकार घडला. या प्रकाराला कुठेही पाठिशी घालणार नाही.

सदर कर्मचाऱ्याचा पूर्वेतिहास माहीत नव्हता का? या प्रश्नावर बोलताना झिरवाळ म्हणाले की, माझ्यासमोर या कर्मचाऱ्याची तक्रार यापूर्वी कधी आली नव्हती. लाचेची रक्कम कितीही असली तरी सरकारी कर्मचाऱ्याने अशाप्रकारे पैसे घेणे चुकीचेच आहे. पैसे घेतले आहेत तर त्याची शिक्षा आता संबंधित व्यक्तीला भोगावी लागेल.

**कट रचल्याचा संशय नाही**

सुनेत्रा पवार यांचे उपमुख्यमंत्रीपद आणि विलीनीकरणाच्या बाजूने बोलल्यामुळे तुमच्याविरोधात कट रचला जात आहे का? असा प्रश्न विचारला असता नरहरी झिरवाळ म्हणाले की, माझ्याविरोधात कुणी कट रचेल असे वाटत नाही. माझा तसा स्वभाव नाही.

मंत्री नरहरी झिरवाळ हे जिल्हा नाशिक मधील दिंडोरी विधानसभेचे राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार ) आमदार आहेत. त्यांनी यापूर्वी विधानसभेचे उपाध्यक्ष पद भूषविले आहे. सध्या त्यांच्याकडे अन्न व औषध प्रशासन हा विभाग आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनानंतर 'सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्री आणि पक्षाध्यक्षपद द्यावे, अशी सर्वप्रथम झिरवाळ यांनीच मागणी केली होती.

### पाकिस्तानची अमेरिकेकडे धाव, ट्रम्प प्रशासनानेही उचलले तातडीचे पाऊल; भारताचा नकाशा का हटवला?

**इस्लामाबाद/वृत्तसंस्था :** भारत आणि अमेरिका यांच्यातील व्यापार करारानंतर अमेरिकेकडून सोशल मीडियावर भारताचा नकाशा प्रसिद्ध करण्यात आला होता. त्यामुळे पाकिस्तानला मिरची झोंबली आहे. या नकाशात अमेरिकेने पाकव्याप्त काश्मीर आणि अक्साई चीन भारताचा प्रदेश दाखवला आहे. मात्र अमेरिकेने हा नकाशा जारी करताच पाकिस्तानी परराष्ट्र खात्याने अमेरिकेकडे धाव घेतली. भारताच्या नकाशावर आक्षेप घेत पाकिस्तानने अमेरिकेकडे नाराजी व्यक्त केली. त्यानंतर ट्रम्प प्रशासनानेही तातडीने पाऊल उचलले. पाकिस्तानने दावा केलाय की, अमेरिकेकडे आम्ही संपर्क करून आमचा आक्षेप नोंदवला त्यानंतर भारताचा नकाशा हटवण्यात आला आहे. ज्यात संपूर्ण काश्मीर भारतात दाखवण्यात आले होते. या नकाशाबाबत आम्ही अमेरिकेच्या अधिकाऱ्यांची संपर्क साधला. त्यानंतर आता णड्ढठ ऑफिसच्या सोशल मिडिया हँडलवरून हा नकाशा हटवण्यात आला आहे. अमेरिकेच्या यूनाइटेड स्टेट्स ट्रेड रिप्रेजेंटेटिव्ह ऑफिसने त्यांच्या अधिकृत ट्विटर अकाऊंटवर भारताचा नकाशा पोस्ट केला होता. या नकाशात पाकव्याप्त काश्मीरसह जम्मू काश्मीर आणि अक्साई चीन भारताचा भूभाग दाखवण्यात आला. मात्र आता तो नकाशा हटवण्यात आला आहे.

## मांजरा कारखाना कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने बांधण्यात येणाऱ्या सांस्कृतिक भवनाचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते भूमिपूजन संपन्न

**लातूर/प्रतिनिधी:** विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखाना लिमिटेड विलास नगर येथे कारखाना साइटवर विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा साखर कारखाना सेवकांची सहकारी पतसंस्थेकडून कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या सांस्कृतिक सभागृहाचे भूमिपूजन माजी मंत्री सहकार महर्षी कारखान्याचे चेअरमन दिलीपरावजी देशमुख साहेब यांच्या हस्ते करण्यात आले

**शेती विभागातील फील्ड कर्मचाऱ्यांना मोटार सायकल वाटप**



मांजरा साखर कारखान्याच्या शेती विभागातील फिल्डवर कार्य करणाऱ्या कर्मचाऱ्यांना मोटार सायकलचे वाटप यावेळी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मांजरा साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे शेतकी कमिटीचे अध्यक्ष कैलास पाटील संचालक मदन भिसे, अनिल दरकसे सचिन शिंदे,मांजरा साखर कारखान्याचे माजी संचालक साजिद बाबा मीया पटेल, पांच्यात समिती सदस्य गुरुनाथ गवळी कार्यकारी संचालक पंडित देसाई, पतसंस्थेचे चेअरमन शरद साळुंखे, सचिव विनयकुमार टमके, पतसंस्थेचे पदाधिकारी, अर्क शाळा प्रमुख योगेश देशमुख, सहाय्यक शेतकी अधिकारी श्री ए पी पवार, कोजन मॅनेजर श्री दळवी, खाते प्रमुख व कर्मचाऱ्यांची उपस्थिती होती.

### जिल्हा युवा पुरस्कार २०२४-२५ साठी अर्ज करण्यास २५ फेब्रुवारी पर्यंत मुदतवाढ

**लातूर/प्रतिनिधी:** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या वतीने जिल्हास्तरीय जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी प्रदान केले जातात. या पुरस्काराद्वारे जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव केला जातो आणि युवा विकासाच्या क्षेत्रात अधिक कार्य करण्यासाठी प्रोत्साहन दिले जाते. लातूर जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत २०२४-२५ च्या पुरस्कारासाठी २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

या पुरस्काराचे स्वरूप गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम १० हजार रुपये असे आहे, तर नोंदणीकृत संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह व रोख रक्कम ५० हजार रुपये इतके आहे. या पुरस्कारासाठी जिल्ह्यातील पात्र युवक, युवती आणि संस्थांकडून अर्ज मागविण्यात आले होते. मात्र, अपेक्षित प्रमाणात प्रतिसाद न मिळाल्याने जिल्हाधिकारी यांच्या निर्देशानुसार अर्ज सादर करण्याची संधी पुन्हा देण्यात येत आहे. जिल्हा युवा पुरस्कार २०२४-२५ साठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत आहे.

इच्छुक युवक-युवती तसेच नोंदणीकृत संस्थांनी जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लातूर येथून अर्ज प्राप्त करून घ्यावेत. अर्जासंबंधित अधिक माहितीसाठी बाबासाहेब इंगोले, क्रीडाधिकारी यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.

### प्रभात किरणे

बोलून खोटे,न होती मोठे
क्षणभर सुख,अनेक तोटे
तुटती नाते,मने,माणसे
जगे एकाएकी,पडती एकटे
– इंजि. नागनाथ
कलवले, लातूर

## सिध्देश्वर यात्रा महोत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन

### महोत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

**लातूर/प्रतिनिधी:** ग्रामदैवत श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर देवस्थानच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्रीचे औचित्य साधून यात्रा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. १५ फेब्रुवारी ते २ मार्च यादरम्यान पार पडणाजया या महोत्सवात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आलेआहे. महोत्सवासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आली असून या यात्रा महोत्सवात अधिका अधिक भाविक व नागरिकांना सहभाग नोंदवावा असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्या विश्वस्तांनी केले आहे.

राज्यभर परिचित असलेल्या लातूर येथील श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर यात्रा महोत्सव महाशिवरात्रीदिनी म्हणजेच दि. १५ फेब्रुवारीपासून सुरु होणार आहे. या महोत्सवानिमित्त शनिवार मध्यरात्री व रविवार पहाटे गवळी समाजाच्या वतीने श्री सिध्देश्वरास दुग्धाभिषेक होणार आहे. यानंतर श्रीच्या दर्शन सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. रविवारी सकाळी १० वाजता जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे यांच्या हस्ते श्रीची महापुजा होवून झेंडावंदनाने यात्रा महोत्सवास प्रारंभ होणार आहे.

तसेच संत सावतामाळी भजनीमंडळ व माळी समाजाच्या वतीने माळी गल्ली येथून मिरवणूक निघून पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे. याच दिवशी म्हणजे रविवार दि. १५ रोजी दुपारी १ वाजता मार्केट यार्ड परिसरातील गौरीशंकर मंदीर येथून पारंपारिक झेंड्यांच्या काठ्याची मिरवणूक निघणार आहे. सदर मिरवणूकीचा



समारोप श्री सिध्देश्वर मंदीर येथेहोणार आहे. रात्री ९ ते ११ या दरम्यान हभप श्री संजय महाराज खडक उमरगेकर यांचे किर्तन तर रात्री ११ ते १ या दरम्यान सुरमणी बाबुराव बोरगावकर, व तालमणी रामभाऊ बोरगावकर यांचे संगीत भजन पार पडणार आहे.

सोमवार दि. १६ फेब्रुवारी रोजी विरशैव तेली समाज बांधवांतर्फे श्रीस गंगेच्या पाण्याचा अभिषेक होणार आहे. यादिवशी संध्याकाळी आळंदी येथील हभप श्री माऊली महाराज कदम यांचे किर्तन पार पडणार आहे. मंगळवार दि. १७ फेब्रुवारी रोजी हभप श्री ज्ञानसिंधू संदीपान महाराज हासेगावकर यांचे किर्तन होणार असून बुधवार दि. १८ रोजी हभप श्री गुरुवर्य पुंडलीक महाराज देहूकर यांच्या किर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. गुरुवार दि. १९ रोजी रात्री ९ वाजता हभप श्री गुरुराज महाराज देगलुरकर यांचे तर शुक्रवार दि. २० रोजी पंढरपुर येथील हभप श्री गोपाळअण्णा महाराज वासकर यांचे किर्तन पार पडणार आहे.

शनिवार दि. २१ रोजी सायंकाळी ६ ते ८ या दरम्यान हभप गुरुबाबा महाराज औसेकर यांचे चक्रीभजन तर रात्री ९ वाजता हभप विजयानंद महाराज सुपेकर यांचे किर्तन पार पडणार आहे. रविवार दि. २२ रोजी सकाळी ११ ते ४ या दरम्यान १००१ महिलांच्या उपस्थितीत श्रीस रुद्राभिषेक करण्यात येणार आहे. तसेच यावेळी महिलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजनही केलेले आहे. याच दिवशी रात्री ८ वाजता शिवरुद्र स्वामी यांची संगीत भजनी होणार आहे. सोमवार दि. २३ रोजी सचिन जाधव व वैष्णवी बरकते यांचे तरे मंगळवार दि. २४ रोजी लातूर येथील संतोष थोरात यांचे संगीत भजन पार पडणार आहे. बुधवार दि. २५ रोजी डॉ. दत्ता राजे यांचे संगीत भजन होणार असून गुरुवार दि. २६ रोजी सकाळी ११ वाजता कृषी पदर्शनाचे उद्घाटन पार पडणार आहे.

याच दिवशी देवस्थान परिसरात पशु व पक्षी पदर्शनाचे उद्घाटन होणार असून यावेळी उत्कृष्ट पुश व पक्षींची निवड स्पर्धा पार पडणार आहे. या दिवशी रात्री ८ वाजता विठ्ठलराव जगताप यांचे संगीत भजन होणार आहे. शुक्रवार दि. २७ रोजी सकाळभ ११ वाजता पशु अश्व व श्र्वान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले असून यावेळी उत्कृष्ट पशु, अश्व व श्र्वान यांची निवड होणार आहे. या स्पर्धेत निवड झालेल्या पशुंना लातूर बाजार समितीच्या वतीने चांदीचा रथ देण्यात येणार असून पशु मालकास प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात येणार आहे. शनिवार दि. २८ रोजी लातूर येथील सुरमणी भुजंग मुर्के तर रविवार दि. १ मार्च रोजी श्री सिध्देश्वर व रत्नेश्वर भजनी मंडळाचा भजन कार्यक्रम संपन्न होणार आहे. रविवार दि. १ मार्च रोजीच देवस्थान परिसरात सकाळी ११.३० पासून कुस्ती स्पर्धांचा फड रंगणार आहे. सोमवार दि. २ मार्च रोजी रात्री ८ वाजता उपविभागीय अधिकारी रोहिणी नजहे यांच्या उपस्थितीत शोभेच्या दारुची आतिषबाजी करून यात्रा महोत्सवाचा समारोप होणार आहे. तसेच याच दिवशी रात्री ९ ते ११ पंडरपुर येथील हभप माधव महाराज शिवणीकर यांचे काल्याचे किर्तन पार पडणार असून यानंतर श्रीची मिरवणूक काढण्यात येणार आहे. तसेच दहीहंडी व महाप्रसादाचे आयोजन यावेळी करण्यात आलेले आहे.

यात्रा महोत्सव १५ दिवस पार पडणार असून यासाठी आवश्यक असणारी सर्व तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. यावर्षी यात्रा महोत्सवात भाविकांसह नागरिकांसाठी विविध आकर्षण राहणार असून आनंद मेळा यासह देवस्थान परिसरात विविध खाद्यपदार्थ व साहित्यांचे स्टॉलही असणार आहे. या यात्रा महोत्सवात लातूर व परजिल्ह्यासह परराज्यातील नागरिक व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन प्रशासक सचिन जांबूतकर यांच्यासह विश्वस्त विक्रम गोजमगुंडे, श्रीनिवास लाहोटी, प्रदीप राठी, मन्मथ लोखंडे, बाबासाहेब कोरे, अशोक भोसले, नरेश पंड्या, सुरेश गोजमगुंडे, रमेशसिंह बिसेन, चंद्रकांत परदेशी व व्यंकटेश हालिंगे यांनी केले आहे.

### रक्तदात्यास थेट दर्शन

यात्रा महोत्सवानिमित्त लातूर येथील डॉ. भालचंद्र ब्लड बँकेच्या वतीने देवस्थन परिसरात महाशिवरात्री दिवशी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. महाशिवरात्री दिवशी श्री सिध्देश्वराच्या दर्शनासाठी भाविक व नागरिकांची मोठी गर्दी असते त्यामुळे रक्तदान शिबिरात रक्तदान केलेल्या दात्यास थेट दर्शनाचा लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे या शिबिरात अधिकाधिक भाविकांनी रक्तदान करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



टाटा ट्रस्ट आणि नाम फाऊंडेशन सोबत राज्य शासनाचे १३सामंजस्य करार...

### चिमटा



दयाचा

कामगारांनी
काढला मोर्चा,
बँकांना दिसून आले लॉक
बांधकाम कामगारांऐवजी
दुसऱ्यालाच मदतीचा हात

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## वादाचा मुद्दा उपस्थितीत करून वेळ घालविला जात आहे

देशात अनेक मुद्दे आहे की जे जनतेविषयक आहेत. जनतेच्या जिव्हाळ्याचे आहेत. असे असले तरी आपल्या देशात मेलेले मडे उकरून त्यावर चर्चा अधिक होते मात्र जे जिवंत आहेत त्यांच्याकडे दुर्लक्ष होते ही बाब आता जनतेला सुद्धा कळून आली आहे. त्यामुळे जे प्रश्न विरोधक उकरून काढत आहेत त्यात तथ्य आहे का? दुसरी बाब आपल्या देशात लोकशाही आहे. अशा लोकशाहीत लिखान, भाषण आदि स्वातंत्र्य आहे. एखाद्याने मत मांडले त्यावर चर्चा झालीच पाहिजे असे नाही. त्याच प्रमाणे देशात अनेकांनी आपले विचार साहित्याच्या माध्यमाद्वारे व्यक्त केले आहेत. त्यापेक्षाही धुतल्या तांदळासारखा या कलयुगात सापडू शकतो का? असे समजले तरी सध्याला वेळकाढू धोरणाचा अमल होत आहे. जे पुस्तक छापले नाही असे सांगत असताना त्याची प्रत माध्यमासमोर दाखविणे योग्य आहे का? तसेच त्यातील लिखाणावरून वादंग सुरु आहे. ती बाब या सरकारच्या काळातील आहे का? मुळात पुर्वीच्या म्हणजे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अगोदर ज्या बाबी घडल्या. गलवान मधील घटना आजची नाही. यावर ताबा किंवा जो भाग चीनने गिळंकृत केला आहे तो अलिकडील काळात नाही हे लक्षात घेतले पाहिजे. म्हणजे वाद उकरून काढून वाद निर्माण केला जात आहे. जनतेचे लक्ष विचलित करण्याचा हा डाव असू शकतो. कारण माजी लष्करप्रमुख जनरल एम.एम. नरवणे यांच्या फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी या आत्मचरित्रा प्रकरणी वाद निर्माण झालेला असताना याप्रकरणी दिल्ली पोलिसांच्या विशेष कक्षाने या पुस्तकाच्या लीकप्रकरणी बहुराष्ट्रीय चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, संरक्षण मंत्रालयाकडून अनिवार्य मंजुरी मिळवण्यापूर्वीच हे पुस्तक जागतिक डिजिटल बाजारपेठेत दाखल झाले असल्याचेही वृत्त समोर आले आहे. हे पुस्तक अमेरिका, कॅनाडा, जर्मनी आणि ऑस्ट्रेलियात मंजुरीपूर्वीच डिजिटली उपलब्ध आहे. पुस्तकाची ही अवैध विक्री कटाचा भाग असल्याचेही पोलिसांनी म्हटले आहे. त्यामुळे याप्रकरणी गुन्हेगारी कट रचण्याच्या आरोपाखाली गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तसेच, पोलिसांनी आता अमेरिका, कॅनडा, जर्मनी आणि ऑस्ट्रेलियामध्ये डिजिटल आणि आर्थिक मार्गांचा मागोवा घेत आहेत, जिथे हे पुस्तक मंजुरीपूर्वी ऑनलाइन उपलब्ध असल्याचा आरोप आहे. तपासातून हेही समोर आले आहे की हे पुस्तक उपलब्ध होण्यापूर्वी डोमेन एक्सटेंशनवर अपलोड करण्यात आले होते. जे ब्रिटिश इंडियन ओशन टेरिटरीशी संबंधित देशाचा कोड डोमेन आहे. यानंतरच हे पुस्तक इतर होस्टिंग प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले. मुळात विरोधकाची भुमिका जी लोकशाहीत महत्त्वाची असते ती जबाबदारी पाळली जात नाही. विरोधक कधी मतचोर म्हणतील, कधी मतदान यंत्रात गडबड म्हणतील, तर कधी काय म्हणतील याचा भरोसा नाही. सतत जे प्रश्न महत्त्वाचे नाहीत. देशासाठी उपयुक्त नाहीत अशा बाबी थेट लोकसभेत उपस्थित केल्या जात आहेत. माध्यामांना जी माहिती दिली जात आहे ही केवळ माहिती दिसून येते याला आधार दिसून येत नाही. प्रकाशन कंपनी सुद्धा आम्ही पुस्तक प्रकाशन केले नाही असे सांगत आहेत. खुद लेखक म्हणत आहे की, आम्ही याला केंद्रिय गृह मंत्रालयाकडून मंजूरी आली नाही. याचा अर्थ जनतेनी काय घ्यावा. मुळात जनतेला जे मुर्ख बनविण्याचा जो प्रयत्न चालू आहे हे जनतेनीच ओळखला पाहिजे. आज पर्यंत विरोधकांनी जनतेसाठी ठोस काय केले? केवळ पदयात्रा काढणे, मतदान मशिनबाबत संभ्रम निर्माण करणे, मतचोरीचा आरोप करणे, परदेशातील घटनेचा भारतीयांशी संबंध असल्याचे सांगणे, अशा विविध बाबी ज्या जनतेमध्ये संभ्रम निर्माण करण्याचा जो प्रयत्न दिसून येतो तो केला जात आहे. २०१४ पासून विरोधक म्हणून काम करीत असताना कोणती ठोस जनतेसोबत राहून कामगिरी केली आहे का? या बाबत जनतेनी विचार करावा. देशातील बॉम्बस्फोट बंद झाले. ३७० कलम हटविला. पाकिस्तान भारताला घाबरतो आहे. राममंदीराची उभारणी केली. जे प्रश्न कठिण होते. देशातील नागरिकांना सुद्धा असे जटील प्रश्न सुटू शकतील असे वाटले नव्हते. त्याची सोडवणुक केली आहे. भारताचा एक दबदबा निर्माण केला आहे. आजही जे ट्रम्प बडबडत असतात ते घाबरून करीत असतील. एवढा भारताचा दबदबा निर्माण केला. जी चुक पंडित नेहरू यांच्या काळात घडली. ती सुधारण्यासाठी माजी पंतप्रधान लाल बहादुर शास्त्री यांना आहुती द्यावी लागली. चीन कसा आहे. तो इंच-इंच भारतात कसा सरकत आला हे जनतेला माहिती आहे. आता आलिकडे माहिती मिळविण्यासाठी कोणाची गरज नाही. प्रत्येक नागरिक शोधू शकतो. माहिती व तंत्रज्ञान एवढे प्रगत झाले आहे की, त्याला तोड नाही. सहज माहिती ती सेकंदाची मिळविण्याची क्षमता निर्माण झाली आहे. असे असताना राहुल गांधी सतत लोकसभेतील वेळ कसा घालवित आहेत याचा विचार जनतेनी केला पाहिजे. लोकशाहीत विरोधकांना अधिक महत्त्व असते. विरोधकावर मोठी जबाबदारी असते, असे असताना केवळ नरेंद्र मोदी यांना बदनाम करण्याचा कल दिसून येतो. चीनने २०१४ नंतर भुभाग घेतला का? तेथे कडक सुरक्षा व्यवस्था निर्माण केली. त्याच प्रमाणे संरक्षणात मोठी वाढ केली. मोठे बजेटमध्ये तरतुद केली. मोदी यांच्या अगोदर साध पाकिस्तान भारताला घाबरत नव्हता. आज पाकिस्तान घाबरतो आहे. चीन, रशियावर दबाव आहे. असे काम करीत असताना संसदेत पंतप्रधानवर काही तरी घडणार म्हणून त्यांना लोकसभेत उपस्थित राहू नका असा सल्ला दिला जातो हे योग्य आहे का? त्यामुळे आता काँग्रेसची एवढी लोकप्रियता असती तर राज्यात झालेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेत यश मिळविता आले असते. आज काँग्रेसच्या ताब्यात किती राज्य आहेत. यावरून जनतेचा काँग्रेसी विचारास पाठींबा नाही. केवळ नको ते मुद्दे उपस्थित केले जातात. वातावरण बिघडण्याचा प्रयत्न होत आहे. मतचोरी, मतदान मशिन, न प्रकाशित झालेल्या पुस्तकाबाबत गोंधळ असे मुद्दे उपस्थित केले जात असले तरी त्याला जनतेचा किती पाठींबा मिळतो आहे याचा काँग्रेसने विचार केला पाहिजे. मेलेले मडे हे निर्जिव असतात, याचे भान ठेवले पाहिजे. जनतेनी आता सावध झाले पाहिजे. नसता आगामी काळात काय अप्रिय घडेल हे सांगता येत नाही.

# लातूर परिमंडलातील चार लाखाव्यावर वीजग्राहक घेत आहेत स्मार्ट वीज मीटरचा लाभ

## अचूक बिल आणि वीज दरात मिळतेय सवलत

**लातूर/प्रतिनिधी :** महावितरणने राज्यातील सर्व वीज ग्राहकांसाठी स्मार्ट टीओडी (टाइम ऑफ डे) वीजमीटर उपलबध करून दिले असून, यामुळे ग्राहकांना केवळ अचूक बिलच मिळणार नाही, तर वीजदरात सवलत मिळवण्याची सुवर्णसंधीही उपलब्ध झाली आहे. लातूर,धाराशिव व बीड जिल्हयाचा समावेश असलेल्या लातूर परिमंडलात आतापर्यंत चार लाख २६ हजार ४९ वीजग्राहकांकडे स्मार्ट टीओडी वीजमीटर बसवण्यात आले असून, त्यांना अचूक बिलासह सवलतीचा लाभ होत आहे. या उपक्रमाबाबत काही लोकांकडून गैरसमज पसरवले जात आहेत. मात्र ग्राहकांनी अफवेला बळी न पडता स्मार्ट मीटर बसवण्यास सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणचे लातूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी केले आहे.




महावितरणने यापूर्वीही काळानुसार वीज मीटरमध्ये बदल केले आहेत. यांत्रिक, इलेक्ट्रोमॅग्नेटिक, इलेक्ट्रॉनिक मीटरनंतर आता स्मार्ट डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे. जुने, सदोष किंवा नादुरुस्त मीटर बदलणे ही नियमित व कायदेशीर प्रक्रिया असून, त्यासाठी ग्राहकांची लेखी परवानगी आवश्यक नाही. ग्राहकांकडे बसवण्यात येणारे स्मार्ट टीओडी मीटर मोफत असून, त्यासाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जात नाही. यासाठी कोणतेही कर्ज काढलेले नसून केंद्र सरकारच्या अनुदानातून हा प्रकल्प राबवला जात असल्याचे महावितरणने स्पष्ट केले आहे. लातूर परिमंडलात आजपर्यंत ४ लाख २६ हजार ४९ वीजग्राहकांडे स्मार्ट टीओडी मीटर बसवण्यात आले आहेत. त्यात लातूर मंडलात २ लाख ३८४, बीड मंडलात १ लाख ०३ हजार ५३६ तर धाराशिव मंडलात १ लाख २२ हजार १२३ स्मार्टमीटर सर्व वर्गवारीतील ग्राहकांकडे बसवण्यात आले आहेत.

**विजेच्या दिवसा वापरावर सवलत**

स्मार्ट टीओडी मीटर डिजिटल तंत्रज्ञानावर आधारित आहे. यात दिवसाच्या वेगवेगळ्या वेळेनुसार वीज वापर मोजण्याची सुविधा आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ या कालावधीत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना प्रति युनिट ८० पैसे ते १ रुपयापर्यंत सवलत मिळत आहे. १ जुलै २०२५ पासून ही सवलत लागू झाली आहे. एखादा घरगुती ग्राहक दरमहा १०० युनिट वीज वापरत असेल, तर जुन्या दरानुसार त्याचे बिल साधारणतः ८७५ रुपये येत होते. नवीन दरकपात आणि स्मार्ट मीटरच्या टीओडी सवलतीमुळे हेच बिल आता फक्त ७८४ रुपयांपर्यंत खाली येऊ शकते.

**सौर ऊर्जा ग्राहकांसाठी वरदान**

प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजने अंतर्गत सौर ऊर्जा प्रकल्प लावणाऱ्या ग्राहकांसाठी हे मीटर उपयुक्त आहे. हे मीटर नेट-मीटरिंगचे कामही करते, ज्यामुळे तुम्ही ग्रीडला दिलेली अतिरिक्त वीज आणि स्वतः वापरलेली वीज याचा अचूक हिशेब ठेवणे सोपे होईल.

**सरासरी बिले होणार इतिहासजमा**

अचूक रीडिंगमुळे सरासरी किंवा अंदाजे बिलांचा त्रास संपणार आहे. जेवढी वीज वापरली, तेवढेच बिल येणार. मीटर पूर्णपणे पोस्टपेड आहेत. सध्याच्या मासिक पद्धतीप्रमाणेच ग्राहकांना बिल भरायचे आहे. महावितरणच्या खास ॲपवर तुम्हाला तासागणिक किती वीज वापरली जात आहे, याची माहिती मिळेल. घर बंद असले तरी मीटर रीडिंग आपोआप मुख्यालयात नोंदवले जाईल.

# लातुरात अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा

## केंद्र सरकारने कामगारहिताचे कायदे रद्द केल्याच्या निषेधार्थ रोष




**लातूर/प्रतिनिधी :** केंद्रातील मोदी सरकारने कामगारांचे हक्क आणि अधिकार असलेले २९ कामगार कायदे रद्द करून नवीन चार कायदे केलेत. हे नवीन चार कायदे कामगारांना व कर्मचाऱ्यांना गुलाम बनवणारे असल्याने ते त्वरित परत घ्यावेत. या व अन्य विविध मागण्यासाठी १२ फेब्रुवारी रोजी कामगार संघटनानी देशभर संप पुकारला होता. त्याचाच भाग म्हणून अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या वतीने सकाळी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे चौक ते जुने जिल्हाधिकारी कार्यालय, शिवाजी चौक लातूर येथे विराट मोर्चा काढण्यात आला. या मोर्चात लातूर जिल्ह्यातील कष्टकरी, श्रमिक व कामगार मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या मोर्चाचे नेतृत्व कामगार नेते तथा अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी केले.

मोदी सरकारने कामगारांच्या हिताचे तब्बल २९ कायदे रद्द करून चार नवीन कायदे केले आहेत. त्यामुळे कामगार वर्गाचे मोठे नुकसान होणार आहे. कामगारांची पिळवणूक करून त्यांना उध्वस्त करण्याचा डाव भाजप सरकारचा आहे.

घरेलू कामगार, बांधकाम कामगार, माथाडी कामगार, कंत्राटी कामगार यांच्या हक्क आणि अधिकारांचे रद्द केलेले २९ कामगार कायदे पुन्हा प्रस्थापित करून त्याची अंमलबजावणी करण्यात यावी, कामाच्या तासांत वाढ करू नये, कायम स्वरूपी बारमाही कामामध्ये कंत्राटी कामगार पद्धत बंद करण्यात यावी, सरकारी, निमसरकारी, सार्वजनिक उद्योग, सेवा उद्योग, नगरपालिका, महानगर पालीका अशा ठिकाणी अस्थाई वर्षानुवर्षे काम करणाऱ्या कंत्राटी, हंगामी, रोजदारी, मानधनावरील कामगाराना/ कर्मचाऱ्यांना विनाअट कायम करण्यात यावे, लोकशाही व स्वातंत्र्य हिरावून घेणारा महाराष्ट्र जनसुरक्षा कायदा रद्द करण्यात यावा, नोंदणीकृत बांधकाम कामगारांच्या पाल्याना देण्यात येणाऱ्या शैक्षणिक सहाय्य योजनेत कोणताही बदल न करता त्या पूर्ववत चालू ठेवावे आदी मागण्या मोर्चाद्वारे करण्यात आल्या.

लातूर शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक येथून अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याला अभिवादन करून मोर्चाला वाजत गाजत सुरुवात झाली. त्यानंतर मोदी सरकारच्या विरोधात घोषणा देत गंजगोलाई, महात्मा गांधी चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे जुने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा धडकला. कामगार नेते राजकुमार होळीकर, लेबर युनियचे नेते सुधीर देशमुख, बसवंतआपा उबाळे, प्रा. सुधीर अनवले, इंजि. शफी शेख यांची भाषणे झाली.

त्यानंतर मोर्चाच्या शिष्ठमंडळाने नवीन जिल्हाधिकारी येथे जाऊन जिल्हाधिकाऱ्यांना मागण्यांचे निवेदन सादर केले.

हा मोर्चा यशस्वी करण्यासाठी संघटनेचे उपाध्यक्ष सुरेश काटे, सचिव शिवाजी भंडारे, इंजि. शफी शेख, लातूर तालुकाद्यक्ष अंकुश टकळगे, शहर सचिव महेंद्र कांबळे, प्रमोद बानाटे, बळीराम कांबळे, किशोर सगर, मंगळताई शिंदे, नूतन अंगरखे, अनिता काकरे, चंद्रपाल गिरी, भागवत पांचाळ व इतर पदाधिकारी, कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# सकाळी रिकाम्या पोटी प्या डाळीचे पाणी, आरोग्याला मिळतील जबरदस्त फायदे

आजकाल बहुतेक आजार बदलेली जीवनशैली आणि चुकीच्या खाण्याच्या सवयींशी संबंधित आहेत. त्यामुळेच लोक असे पदार्थ शोधतात जे फक्त शरीराला पोषणच देत नाहीत तर विषारी पदार्थ काढून टाकण्यास आणि रोगप्रतिकारक शक्ती वाढविण्यास मदत करतात. त्यातीलच डाळीचे पाणी हा एक सोपा, स्वस्त आणि प्रभावी उपाय आहे. ज्याला आयुर्वेदात खूप महत्त्व आहे.

डाळीचे पाणी हे आपल्या स्वयंपाकघरात बनवलेले, हलके, सहज पचणारे आणि पौष्टिकतेने समृद्ध असलेले आरोग्यदायी पेय आहे. डाळींचे पाणी सामान्यतः मुलांना, वृद्धांना आणि आजारातून बरे होणाऱ्यांना दिले जाते. परंतु आयुर्वेदिक तज्ञांच्या मते, सकाळी रिकाम्या पोटी डाळीचे पाणी सेवन केल्यास त्याचे फायदे अनेक पटीने वाढतात. याच फायद्यांबाबत जाणून घेऊया

शरीरातील विषारी पदार्थ बाहेर पडतात-

आजकाल जंक फूड, प्रदूषण आणि ताणतणाव यामुळे शरीरात विषारी पदार्थ जमा होतात. डाळीचे पाणी शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकण्यास मदत करते. नियमितपणे सेवन केल्यास ते यकृत आणि किडनीच्या कार्याला मदत करते आणि रक्त शुद्ध करते.

वजन कमी करते-

जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर डाळीच्या पाण्याचा तुमच्या आहारात समावेश करावा. त्यात कॅलरीज कमी आणि पोषणद्रव्ये जास्त असतात. रिकाम्या पोटी डाळीचे पाणी पिल्याने तुम्हाला जास्त वेळ पोट भरल्यासारखे वाटते, जास्त वेळ खाण्याची इच्छा कमी होते. तसेच ते चयापचय सक्रिय करते आणि चरबी जाळण्याच्या प्रक्रियेला मदत करते.

रोगप्रतिकारशक्ती वाढवते-

डाळीच्या पाण्यात प्रथिने, फायबर, खनिजे आणि जीवनसत्त्वे भरपूर असतात. सकाळी रिकाम्या पोटी सेवन केल्यास ते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करते. आयुर्वेदानुसार डाळीचे पाणी शरीरातील धातूंचे पोषण करते आणि जे रोगप्रतिकारक शक्तीचा पाया आहे. हे पाणी फक्त हंगामी आजारांपासून संरक्षण करत नाही तर विषाणू आणि बॅक्टेरियाच्या संसर्गाचा धोका देखील कमी करते.

पचनशक्ती सुधारते-

आयुर्वेदानुसार, पचनशक्तीचा मुख्य पाया 'अग्नि' आहे. जेव्हा अग्नी कमकुवत होते तेव्हा एखाद्या व्यक्तीला गॅस, अपचन आणि बद्धकोष्ठता यासारख्या समस्या येतात. रिकाम्या पोटी डाळीचे पाणी प्यायल्याने अग्नी वाढते आणि पचनसंस्था मजबूत होते.

# स्वच्छ पर्यावरणासाठी सक्षम अभियानाचा संकल्प!

भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या 'सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)' हे राष्ट्रीय अभियान १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा)'' या घोषवाक्यासह संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे त्यानिमित्तष्ठ

जागतिक पातळीवर वेगाने बदलणाऱ्या हवामानामुळे आणि वाढत्या प्रदूषणामुळे मानवासमोर आज मोठे आव्हान उभे राहिले आहे. पारंपरिक इंधनांचा वापर दिवसागणिक वाढत गेल्याने निसर्गावर मोठा ताण पडत असून, त्याचे दुष्परिणाम आरोग्य, पर्यावरण आणि अर्थव्यवस्थेवर ठळकपणे दिसू लागले आहेत. भविष्यात हे संकट आणखी भयावह होवू नये यासाठी समाजाने स्वच्छ, शाश्वत आणि पर्यावरणपूरक ऊर्जेकडे प्राधान्याने वळणे, ही काळाची गरज बनली आहे.

कोळसा, पेट्रोल, डिझेल यासारखी पारंपरिक इंधने मर्यादित स्वरूपाची आहेत. त्यांच्या ज्वलनामुळे मोठ्या प्रमाणात कार्बन डायऑक्साइड, कार्बन मोनॉक्साइड आणि इतर घातक वायू वातावरणात मिसळतात. यामुळे जागतिक तापमानवाढ, हवामानातील टोकाचे बदल, पावसाचे असम तोल स्वरूप तसेच आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. श्वसनविकार, हृदयविकार आणि त्वचारोग यांसारखे आजार याच प्रदूषणाशी थेट जोडलेले आहेत. यावर उपाय म्हणून नवी ऊर्जा क्रांती आकार घेत आहे. सौर ऊर्जा, पवन ऊर्जा, जलविद्युत, बायोगॅस, बायो-इंधन आणि हरित हायड्रोजन यांसारखे पर्याय आज प्रभावीपणे पुढे येत आहेत. या ऊर्जास्रोतांची सर्वात मोठी जमेची बाजू म्हणजे, ते अक्षय आहेत आणि पर्यावरणाला कमीत कमी हानी पोहोचवता. पवन ऊर्जा निर्मितीमुळे इंधन आयातीवरील खर्च कमी होऊन देशाची आर्थिक बचतही होते. ऊसाच्या चिपाडापासून बनविल्या जाणाऱ्या इथेनॉलसारख्या पर्यायी इंधनाकडेही आपला देश गांभीर्याने पाहू लागला आहे.

अलीकडच्या काळाचा विचार केल्यास, वाहतूक क्षेत्रातही मोठे बदल होतांना दिसत आहेत. इलेक्ट्रिक वाहने, हायब्रिड वाहने आणि पर्यायी इंधनावर चालणारी वाहने यांचा वापर वाढत आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत प्राधान्याने स्वच्छ इंधनाचा समावेश केल्यास प्रदूषणावर प्रभावी नियंत्रण मिळवता येऊ शकते. यासोबतच इंधन बचतीच्या सवयी, कार पूलिंग, सायकलचा वापर आणि पायी चालण्यास प्रोत्साहन देणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे.

घरगुती पातळीवरही स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवता येऊ शकतो. सौर पॅनल्सद्वारे वीज निर्मिती, बायोगॅस प्रकल्प, ऊर्जा कार्यक्षम उपकरणांचा वापर आणि विजेचा अपव्यय टाळणे या छोट्या गोष्टी मोठा बदल घडवू शकतात. शाश्वत जीवनशैली स्वीकारणे म्हणजे केवळ पर्यावरणाचे संरक्षण नव्हे, तर पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित भविष्य घडवण्याच्या दृष्टीने या ऊर्जा क्रांतिकडे पाहायला हवे.

या दिशेने केंद्र व राज्य सरकारांकडून विविध अभियानांद्वारे जनजागृती केली जात आहे. 'सक्षम'सारख्या मोहिमा नागरिकांना पर्यायी इंधनांचा स्वीकार करण्यासाठी प्रेरित करत आहेत. उद्योग क्षेत्र, तसेच शहरे आणि ग्रामीण भागातही हरित ऊर्जेचा वापर वाढवण्यासाठी धोरणात्मक पावले उचलली जात आहेत. यामध्ये संशोधन, नवतंत्रज्ञान आणि स्थानिक सहभाग आदिला विशेष महत्त्व दिले जात आहे. स्वच्छ पर्यावरण हा केवळ सरकारचा किंवा एखाद्या संस्थेचा विषय नसून, ती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. आज प्रत्येक स्तरावर घेतलेले छोटे निर्णय उद्याच्या मोठ्या संकटांना टाळू शकतात. पर्यायी ऊर्जेचा वापर, इंधन बचत, वृक्षसंवर्धन आणि पर्यावरणपूरक सवयी अंगीकारल्यास हरित, सुरक्षित आणि समृद्ध भविष्यासाठी आपण भक्कम पायाभरणी करू शकतो. हीच खरी ऊर्जा क्रांती असून तिच्यात आपण सर्वांनी सहभागी होणे, ही काळाची गरज आहे.

# सकाळच्या रुटीनमध्ये सामील करा 'या' गोष्टी, त्वचेला मिळेल नैसर्गिक ग्लो

आजकाल चमकदार आणि स्वच्छ त्वचा मिळवण्यासाठी आपण सर्वजण विविध गोष्टी वापरतो. बऱ्याचदा, लोकांचा असा विश्वास असतो की आपण आपल्या त्वचेवर जितके जास्त थर लावू तितका जास्त फायदा होईल. त्यामुळे आपण बाजारातून अनेक क्रीम आणि लोशन खरेदी करतो.

नंतर, आपण ते एकामागून एक आपल्या त्वचेवर लावतो, परंतु आपल्या त्वचेला खरोखर त्यांचा फायदा होत आहे की नाही याकडे दुर्लक्ष करतो. परंतु त्वचा नैसर्गिकरित्या नितळ बनवण्यासाठी आपल्या दिनचर्येत काही आवश्यक बदल करण्याची आवश्यकता असते. आज आपण याबाबत जाणून घेऊया..

उठल्यावर कोमट पाणी प्या-

त्वचा निरोगी आणि हायड्रेटेड राहणे अत्यंत महत्वाचे आहे. यासाठी सकाळी उठल्यावर भरपूर पाणी प्यावे. कारण रात्री पाणी शोषले जाते, ज्यामुळे डिहायड्रेशन होते. जर तुम्ही चहा किंवा कॉफी पित असाल, तर यापूर्वी तुम्ही एक पूर्ण ग्लास कोमट पाणी प्यावे. यामुळे तुमच्या त्वचेत आणि शरीरात ओलावा टिकून राहतो.

चेहऱ्यावरची घाण साफ करणे-

सकाळी उठून कोमट पाणी पिल्यानंतर तुम्ही सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तुमचा चेहरा स्वच्छ पाण्याने धुवून घ्यावा. यामुळे रात्री त्वचेवर साचलेले तेल आणि बॅक्टेरिया धुऊन जातील. यामुळे त्वचेचा वरचा थर खराब होण्यापासून वाचू शकतो. या बॅक्टेरियामुळे होणाऱ्या पिंपल्सरख्या समस्याही दूर होतात.

आहार-

चेहऱ्यावर चमक आणण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात अँटिऑक्सिडंटयुक्त पदार्थांचे प्रमाण वाढवावे. हे फ्री रॅडिकल्सशी लढण्यास आणि नैसर्गिकरित्या तुमची त्वचा उजळ करण्यास मदत करते. तसेच तुम्ही तुमच्या आहारात व्हिटॅमिन सीचा समावेश करावा. हे दोन्ही पोषक घटक त्वचेसाठी खूप फायदेशीर आहेत आणि अनेक समस्या टाळण्यास मदत करू शकतात.

घरातही सनस्क्रीन वापरावे-

ऋतू कोणताही असो तुम्ही सनस्क्रीन नक्कीच वापरायला हवे. प्रत्येक त्वचेच्या प्रकारासाठी ते आवश्यक आहे. घरीसुद्धा सनस्क्रीन वापरायची सवय लावा. परंतु प्रत्येक त्वचा वेगळी असते, म्हणून तुम्ही उच्च एसपीएफ असलेले सनस्क्रीन वापरावे. यामुळे सूर्याच्या हानिकारक अतिनील किरणांपासून त्वचेचे संरक्षण होईल.

# जंगलतोडीत भारत अव्वल क्रमांकावर

केंद्रीय पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाने २०२० पासून रस्ते, खाणकाम आणि जलविद्युत प्रकल्पांसाठी दिलेल्या मंजुरीमुळे भारताची सुमारे एक लाख हेक्टर वनजमीन नष्ट झाली आहे, अशी माहिती लोकसभेत देण्यात आली. तर दुसरीकडे केंद्र सरकारने प्रकाशित केलेल्या 'भारत वनस्थिती अहवाल २०२३' मध्ये (आयएसएफआर) देशाच्या वनक्षेत्रात २५ टक्के वाढ नोंदवली आहे. परंतु वाढलेल्या वनक्षेत्राबाबत केंद्र सरकारने आकडे फुगवलेले असल्याचे या क्षेत्रातील अनेक तज्ज्ञांनी मत मांडले. कारण केंद्र सरकारने ज्या क्योटो कराराचा हवाला देऊन भारताच्या वनक्षेत्राची व्याख्या केली आहे त्यानुसार, एक हेक्टर वा त्याहून मोठ्या कोणत्याही क्षेत्राचा दहा टक्के वा त्याहून जास्त भाग जर झाडांच्या विस्ताराने व्यापलेला असेल आणि ती झाडे दोन मीटर किंवा त्याहून उंच असतील, तर जमीन कोणाच्या मालकीची आहे वा काय हेतूने झाडे लावलेली आहेत, हे न पाहता ते 'वन' समजले जाईल आणि त्यात फळबागा, बांबूची बने, ताड लागवड आदींचा ही समावेश असेल. या व्याख्येनुसार सरकारने 'जे जे हिरवं ते ते जंगल !' अशी धारणा करून घेतली आहे. वन - जंगले ही पर्यावरणाची फुफ्फुसे समजली जातात. पण विकास कामांच्या नावाखाली बेसुमार वन - जंगल सफाई सुरू आहे. केंद्र सरकारचीच आकडेवारी सांगते की भारतात दरवर्षी १.५ लाख हेक्टर्स जंगल नाहीसे होत असावे. मात्र प्रत्यक्षात दरसाल याच्या सुमारे सातपट म्हणजेच दहा लाख हेक्टर्स जंगल नष्ट होत असावं असा पर्यावरण तज्ज्ञांचा अंदाज आहे. निती आयोगाच्या अहवालानुसार एकूण क्षेत्रफळाच्या ३३ टक्के जंगल असणे आवश्यक आहे आणि आज ते २४ टक्क्यांपर्यंत घसरले आहे; ते ही केंद्र सरकारने केलेल्या 'जे जे हिरवं ते ते जंगल' या धारणेनुसार ! इंग्लंडमधील युटिलिटी बीडर संस्थेच्या अहवालानुसार जंगलतोडीत भारत जगात दुसर्या क्रमांकावर असून ब्राझील पहिल्या क्रमांकावर आहे.यातही नोंद घ्यावी अशी आकडेवारी म्हणजे जागतिक मंचावर प्रदूषण, तापमानवाढ, हवामान बदल यावर उपदेशांमृत देणार्या मोदी राजवटीतील २०१५ ते २०२० या काळात भारतात जंगलतोडीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून ही वाढ गेल्या ३० वर्षातील सर्वाधिक आहे. राष्ट्रीय - आंतरराष्ट्रीय मंचावर पर्यावरण संवर्धन, प्रदूषण आणि हवामान बदलांबाबत इतरांना उपदेशांमृत पाजणार्या मोदी राजवटीत मागील पाच वर्षांत तब्बल १० हजार २६ प्रकल्पांना परवानगी देण्यात आली, तर केवळ १२० प्रकल्प नाकारले आहेत. आधीच्या यूपीए सरकारच्या २००९ ते २०१४ काळच्या राजवटीत पर्यावरणावर होणार्या प्रतिकूल परिणामांचा निकष लावून नामंजूर करण्यात आलेल्या प्रकल्पांची टक्केवारी ११.९ होती ती मोदी सरकारच्या २०१४ पासून ते आजपावेतोच्या राजवटीत १.१ टक्क्यांवर घसरली असल्याची माहिती पुढे आली आहे.



मध्यंतरी प्रदूषणामुळे हवामान बदलाच्या विनाशकारी परिणामांपासून पृथ्वीला वाचवण्याच्या उद्देशाने पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त राष्ट्रांचे महासचिव टोनियो गुटेरेस यांनी गुजरातमधील केवाडिया येथे 'स्टॅच्यू ऑफ युनिटी' मध्ये 'मिशन लाइफ' या अभियानाची सुरुवात केली. पण अमेरिकी संस्थांनी जगातील १८० देशांचा जो पर्यावरण निर्देशांक जाहिर केला आहे यात भारत तळाला आहे.

# तोरणमाळ





सिता गुफा

उंचीने महाबळेश्वर पाठोपाठ महाराष्ट्रातील द्वितीय क्रमांकाचे थंड हवेचे ठिकाण म्हणजे नंदुरबार जिल्ह्यातील तोरणमाळ होय. समुद्रसपाटीपासून ११४३ मीटर उंचीवर असलेले हे स्थान सातपुडा पर्वतरांगांमध्ये आहे. राज्यातील इतर पर्यटन स्थळांप्रमाणे विकसित न झाल्याने हे स्थान केवळ उत्तर महाराष्ट्रातील पर्यटकांचेच विशेष आकर्षण आहे. तोरणमाळ हे उत्तर महाराष्ट्रातील एकमेव थंड हवेचे ठिकाण आहे (खानदेशच्या जनतेच्या आवडीचे सापुतारा हे स्थळ गुजरात राज्यात येते.) जवळपास कुठल्याही शहराचा आणि वर्दळीचा अभाव या कारणांनी तोरणमाळने आ-पले नैसर्गिक सौंदर्य जपले आहे.

तोरणमाळ येथील प्रमुख आकर्षण

१) सात पायरीचा घाट - घाट चढून गेल्यावर शेवटच्या उंच टोकावरून रस्त्याकडे पाहिल्यास एका खाली एक सात पायऱ्या दिसतात. हा घाट तोरणमाळ पासून ४ किमी आधी सुरु होतो. सात पायरी घाटाच्या पायथ्याशी काळा पाणी नावाचा पहाड आहे. गंभीर गुन्हे केलेल्या कैद्यांना इंग्रज या पहाडावरून लोटून देत असत. तोरणमाळ माथ्याच्या सुरुवातीलाच असलेल्या एका गुहेत अर्जुनाची आदि मानवाच्या अवस्-थेतील मूर्ती आहे म्हणून त्याला नागार्जुनाची गुहा असेही म्हणतात.

२) सिताखाई पॉइंट (सिता गुफा) - तोरणमाळच्या ईशान्य भागात सिताखाई पॉइंट आहे. प्रचलित आख्यायिकेनुसार प्रभू रामचंद्र सितेसोबत या भागातून जात असताना या ठिकाणी रथ अडकून गुफा तयार झाली. येथे रथाच्या दोन चाकांची तसेच घोड्याच्या खुरांच्या खुणा आजही स्पष्ट दिसतात. भौगोलिकदृष्ट्या ही गुफा पाषाण आणि उंच सुळक्यांनी वेढलेली आहे. सीतेला तहान ला-गली असता प्रभू रामचंद्रांनी पृथ्वीच्या पोटात बाण मारून भूगर्भातील जल बाहेर काढले. ते स्थळ आज सिताकुंड म्हणून ओळखले जाते. सिताखाई धबधब्यातून वाहणारे पाणी पुढे सरकल नदीला जाऊन मिळते. पुढे ही नदी नर्मदेस मिळते.




यशवंत तलाव

३) यशवंत तलाव - वर्षातील बाराही महिने पाणी असणाऱ्या तोरणमाळ मधील या तलावाची मोहिनी राज्याचे पहिले मुख्यमंत्री अशावंतराव चव्हाण यांच्यावरही पडली होती. त्यांच्या भेटीनंतर २६ सप्टेंबर १९६९ पासून या तलावाचे यशवंत तलाव असे नाव नामकरण झाले. या तलावाचे मूळ नाव अज्ञात आहे. या ठिकाणी बोटिंगची सोय उपलब्ध आहे. तलावातील पाणी पुढे सिताखाईच्या धबधब्याला जाऊन मिळते. गोरक्षनाथ मंदिर, खडकी पॉइंट, पुरातन किल्ला हे स्थळ, सूर्योदय आणि सूर्यास्थाचे विलोभनीय दृश्य ही तोरणमाळची इतर वैशिष्ट्ये आहेत.

## सर्वोत्कृष्ट भक्ती मार्ग - आचार्य दिव्यचेतनानंद

# विद्वानांनुसार, ईश्वर प्राप्तीचे ३ मार्ग





आहेत-ज्ञान, कर्म व भक्ती. खरंतर हेच ज्ञान आहे की, ज्या माध्यमातून ईश्वर कोण आहे? हे आपण जाणतो. ज्ञानाचा संग्रह आपल्या मेंदूत असतो व निर्विवादपणे हे आपणास ईश्वरकडूनच मिळते. मनवाचा मेंदू छोटा असतो मग अशा स्थितीत तो ईश्वराला कसा जाणू शकेल? हा प्रश्न निर्माण होतो. वास्तवात मेंदूत असलेल्या ज्ञानानेच हे शक्य होऊ शकते. ज्ञानामुळे मन तृप्त होते. श्रीआनंदमूर्तिके यांच्यानुसार, जोपर्यंत मानवात ज्ञानाची जाणीव राहिल तोपर्यंत त्याने ज्ञान ग्रहण करत राहिले पाहिजे. एका मर्यादेनंतर आपल्या ज्ञानाची भूक मंदावते कारण तोपर्यंत आपले लक्ष्य ईश्वर प्राप्ती होते.

काही विद्वान मानतात की, कर्मामुळे ईश्वर प्राप्ती होते कारण कर्म न करता मनुष्य एक क्षण सुद्धा जिवंत राहू शकत नाही. म्हणून आपण कर्म करत राहिले पाहिजे पण कर्म चांगले असायला हवेत. गीतेत प्रभू श्रीकृष्णाने मान-वास कुठल्याही फळाची अपेक्षा न करता कर्म करत राहण्याचा सल्ला दिला आहे. सांगण्याचे तात्पर्य धार्मिक व आध्यात्मिक जगात ज्ञानाला जेवढी किंमत आहे त्यापेक्षा कमी कर्माची नाही. विद्वान म्हणतात की, जर निर्मळ भावाने ईश्वराची भक्ती केली तर ते सहज मिळतील. खरंतर भक्ती मार्गाची कास मोठ-मोठ्या ज्ञानवंतांनी चोखाळली आहे. आपण सर्व मानतो की, सृष्टीची निर्मिती ईश्वरानेच केली आहे.

म्हणून जगातील प्रत्येक जीव परमात्म्याचे संतान आहे. जर आपण परमात्माला प्रसन्न करु इच्छित असाल तर त्यांची संतान म्हणजे प्रत्येक जीवप्रती प्रेम-भाव ठेवा व यासाठी आपण मानवसेवा व समाजसेवा केली पाहिजे तसेच निराधारांना आधार दिला पाहिजे. मान-वसेवा करताना आपण नेहमी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की, हा सर्व खटाटोप ईश्वर प्राप्तीसाठी केला जात आहे. खरंतर हीच भक्ती आहे. त्यामागे दुसरे कुठलेही कारण नाही. जर भक्तीभाव निर्माण झाला तर ईश्वर प्राप्तीचा मार्ग मिळाला, असे समजा.

## १ Doctor Tips — सल्ला डॉक्टरचा

### वैवाहिक जीवनाच्या सुखासाठी

कामेच्छा वाढवणारा सहवास तुम्हाला फक्त भरपूर आनंद देत नाही, तर तुमची कामेच्छा देखील वाढवतो. महिलांमध्ये सहवासादरम्यान योनी स्ने-हक आणि रक्त संचार वाढवतो, महिला याद्वारे फक्त आनंद घेतात एवढं म्हणण्यापेक्षा त्या शारीरीक रूपाने अधिक सदृढ देखील राहतात.



५) महिलाच्या ब्लेडर कंट्रोलमध्ये मदतशीर-सहवास महिलांसाठी अनेक बाबतीत महत्वाचा आहे, यामुळे महिलांचं ब्लाडर कंट्रोल म्हणजेच मूत्राशय नियंत्रणाची क्षमता वाढत जाते.

## २ Joke — विनोद






शिक्षक : तुला गणित येत नाही, इतिहास जमत नाही, विज्ञान समजत नाही. मग तुला येते तरी काय?

विद्यार्थी : यो साऱ्याचे नाव ऐकून घाम येतो.

## ३ Message — संदेश



Dhådkån Dil Ki Ruk Jåti Hai; Sånse Aksår Thåm Jåti Hai; Båhut Buri Hålat Hoti Hai Yååro; Jåb Girlfriend Se Shåådi Kårne Ki Nåubåt Aåti Hai!

## ४ Thought — सुविचार




कर्तव्यदक्ष असावे पण कर्मठ नसावे.

संस्कृत सुभाषित

सुबीजं चैव सुक्षेत्रे जातं संपद्यते यथा।।

अर्थ : उत्तम बीज उत्तम शेतात पडले तर उत्तम प्रकारचे पिक येते.

# महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. खर्चात कपात
६. पुष्कट
९. पोटापुरता शिधा
११. प्रमाणपत्र
१२. विश्रांती
१४. गणगोत
१६. तात्काळ
१८. आपला देश
१९. मोठी चूल
२०. चोरी करणारा
२२. झाडलोट
२४. वाढलेला व्याप
२५. जरतारीचा मोर यावर नाचतो
२७. प्रयत्न
२८. घाव, प्रहार
२९. रोखलेली नजर
३१. संतोष, आनंद
३४. समुद्रकिनारा
३८. पुरुष
३९. शिव! शिव!
४०. नुसतीच भटकंती
४१. विशेष
४२. अत्यंत यातनामय अवस्था
४५. माळ, सर
४६. हात
४८. पर्जन्य
४९. फोडातील द्रव
५०. गप्पांची जागा
५२. वक्र
५३. पूर्ण भेदून जाणारे
५४. शरीर
५५. अरण्य, जंगल
५६. तीव्र, अत्यंत टोकदार
५७. दिवस
५९. अर्धांगवायू
६१. चर्चा
६३. कावळा
६४. थोडेसुद्धा, अल्पप्रमाण
६५. टोळीचा प्रमुख
६७. खिडकी
६९. मच्छर
७१. तातडीचे संदेशवहन करण्याचा नामशेष झालेला प्रकार
७३. हनुमान (ग्रा.)
७५. प्रेम, ममता
७७. हमाल
८१. सूर्याचे एक नाव
८२. ठोक, हाण!
८३. युक्ती
८४. नेता, पुढारी

### उभे शब्द

१. कपडालत्ता
२. टिंगल, टवाळी
३. केव्हा (ग्रा.)
४. शाश्वत, चिरंतन
५. सोन्या-चांदीचा व्यापारी
७. महाशिवरात्रीचा मराठी महिना
८. परस्पर
९. पुन्हा पुन्हा
१०. प्रगती, उन्नत
१२. विमान
१३. कच्चे राहिल्यास निरूपयोगी मृत्तिकापात्र
१५. निवासस्थान
१७. आत-बाहेर करण्याची चौकट
२१. दात
२३. वंशपरंपरागत अधिकार
२६. फळातील द्रव
२७. सामान्य
३०. तापापूर्वीचे शहारे
३२. माणूसकी
३३. धैर्य, हिंमतीचे काम
३५. मगज
३६. कडक, न दबणारे
३७. साहित्यातील नऊ भावना
४१. मीठाची चव
४२. नाकी दम आणणारा आकडा
४३. भरपूर रस असलेला
४४. वेडावाकडा
४५. परिस्थिती
४६. पळसाचा डिंक
४७. जन्म-मृत्यू
४८. मोदकाचे आच्छादान
५०. पत्र
५१. अभिप्राय
५३. नाविकदल
५५. मध्यरात्रीचा पाऊस
५८. विरोध, द्वेष
६०. आठवाड्याचा दिवस
६२. चिकटून, जवळ
६६. अति तीव्र, जाळणारे
६८. माफी, दया
७०. दाताखालचा, मदतनीस
७२. महान
७४. कैकयीची दासी
७६. वेदना
७७. वजन
७८. सुंदर तरुणी, पत्नी
७९. शंकर
८०. शेवट

### आडवे उत्तरे

१.काटकसर ६.अमाप ९.पसाभार ११.परवाना १२.आराम १४.घरदार १६.तडकाफडकी १८.भारत १९.भट्टी २०.चोर २२.कोवारे २४.पसारा २५.पदर २७.सायास २८.वार २९.टक ३१.समाधान ३४.सागरतट ३८.नर ३९.हरहर ४०.वणवण ४१.खास ४२.नरकवास ४५.हार ४६.कर ४८.पाऊस ४९.लस ५०.टमटमनगरी ५२.वाकडा ५३.आरपार ५४.तन ५५.रान ५६.तीक्ष्ण ५७.वासर ५९.लकवा ६१.मसलत ६३.काक ६४.लवमात्र ६५.सरदार ६७.गवाक्ष ६९.डास ७१.तार ७३.हणमंत ७५.माया ७७.भारवाहक ८१.प्रभाकर ८२.मार ८३.करामत ८४.नायक

### उभे उत्तरे

१.कापडचोपड २.टर ३.कवा ४.सनातन ५.सराफ ७.माघ ८.परभारे ९.परतपरत १०.भरभराट १२.आकाशयान १३.मडके १५.दार १७.कीरवा २१.रद २३.वारसाहक्क २६.रस २७.साधारण ३०.कसकस ३२.मानवता ३३.साहस ३५.गर ३६.टणक ३७.नवरस ४१.खारट ४२.नऊ ४३.रस-वान ४४.वाकडातिकडा ४५.हालहवाल ४६.कमरकस ४७.जननमरण ४८.पारी ५०.टपाल ५१.मत ५३.आरमार ५५.रातवा ५८.सवतासुभा ६०.वार ६२.लगत ६६.दाहक ६८.क्षमा ७०.सहाय्यक ७२.थोर ७४.मंथरा



# क्रीडा विश्व



## थोडक्यात/ संक्षिप्त



### उस्मान तारिकच्या हाताला दोन कोपरे, बॉलिंग ॲक्शनवरून वाद, धोनीच्या बायोपिकने बदलले जीवन

दिल्ली–पाकिस्तानी गोलंदाज उस्मान तारिक त्याच्या गोलंदाजीच्या ॲक्शनमुळे सध्या चर्चेत आहे. टी२० वर्ल्ड कपमधील सामन्यात उस्मान तारिकने अमेरिकेच्या विरुद्ध ३ विकेट घेऊन पाकिस्तानच्या विजयात महत्वाची भूमिका बजावली होती. त्यानंतर त्याच्या गोलंदाजीच्या ॲक्शनबाबत पुन्हा एकदा वाद निर्माण झालाय.

धोनीच्या बायोपिकमुळे बदलले जीवन :

पाकिस्तानचा गोलंदाज उस्मान तारिक हा मिडिल ईस्टमध्ये सेल्समनचं काम करत होता. मात्र माजी भारतीय कर्णधार महेंद्र सिंह धोनीची बायोपिक १ए धोनी: द अनटोल्ड स्टोरी पाहून उस्मान तारिकने क्रिकेटकडे पुन्हा मोर्चा वळवला. उस्मान तारिकने त्याची सेल्समनची नोकरी सोडली आणि क्रिकेटमध्ये करिअर बनवण्याच्या दिशेने प्रवास सुरु केला. भारताचा माजी कर्णधार महेंद्र सिंह धोनी आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करण्यापूर्वी दक्षिण पूर्व रेल्वेमध्ये टीसीची नोकरी करत होता.

उस्मान तारिकच्या हाताला दोन कोपरे :

गोलंदाज उस्मान तारिकच्या एका हाताला दोन कोपरे आहेत.

### ओमानच्या फलंदाजाने घडवला इतिहास! ३० वर्षात अशी कामगिरी करणारा ठरला पहिलाच फलंदाज

मुंबई–आयसीसी टी –२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेत आज झालेल्या सामन्यात श्रीलंका आणि ओमान हे दोन्ही संघ आमनेसामने आले होते. या सामन्यात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी विजय मिळवला आहे. हा सामना श्रीलंकेतील पल्लेकल्लेत पार पडला. या सामन्यात श्रीलंकेच्या खेळाडूंनी फलंदाजी, गोलंदाजी आणि क्षेत्ररक्षणातही दमदार कामगिरी केली. या कामगिरीच्या बळावर श्रीलंकेने एकतर्फी विजयाची नोंद केली. ओमानने हा सामना गमावला, पण ओमानचा फलंदाज मोहम्मद नदीमने मोठ्या रेकॉर्डला गवसणी घातली आहे.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करताना श्रीलंकेने ओमानसमोर डोंगरा इतकी धावसंख्या उभारली. श्रीलंकेकडून फलंदाजी करताना ३ फलंदाजांनी दमदार अर्धशतकं झळकावली. पवन रथनायके, कर्णधार दासून शनाका आणि कुसल मेंडिस यांनी दमदार अर्धशतकं झळकावली. या अर्धशतकी खेळीच्या बळावर श्रीलंकेने २२५ धावांचा डोंगर उभारला.

### वानखेडेवर ममोस्का ब्रदर्सच्चे वादळ; फुटबॉल जगतात वर्चस्व गाजवणाऱ्या देशाने क्रिकेटमध्ये केला मोठा कारनामा

मुंबई–सध्या सुरु असलेल्या टी–२० विश्वचषकातील १७ वा सामना नेपाळ आणि इटली क्रिकेट संघात मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर खेळवण्यात आला. दोन्ही संघ गट–क मध्ये होते. इंग्लंडविरुद्धच्या पराभवानंतरही प्रभावी कामगिरीमुळं नेपाळला या सामन्यात फेव्हरिट मानलं जात होतं. दुसरीकडे, इटलीनं त्यांच्या खेळानं सर्वांना चुकीचं सिद्ध केले, त्यांनी हा सामना १० विकेट्सनं एकतर्फी जिंकला आणि ऐतिहासिक विजय नोंदवला. पहिल्यांदाच टी–२० विश्वचषक खेळणाऱ्या इटलीचा स्पर्धेच्या इतिहासातील हा पहिला विजय होता. या सामन्यात इटलीच्या संघाला १२४ धावांचं लक्ष्य ठेवण्यात आलं होतं, जे त्यांनी १२.४ षटकांत पूर्ण केलं.

पहिल्यांदाच मिळवला १० विकेटनं विजय : इटलीनं १९३४, १९३८, १९८२ आणि २००६ मध्ये विश्वचषक जिंकून फुटबॉलच्या जगात आपलं कौशल्य दाखवलं आहे.

# भारताचा नामिबियावर दणदणीत विजय

## टीम इंडियाचे गोलंदाज ठरले गेमचेंजर; हार्दिक–इशान–वरूण ठरले स्टार




**भारत आणि नामिबिया यांच्यातील सामन्यात टीम इंडियाने शानदार विजय मिळवला आहे. या विजयासह टीम इंडियाने गट टप्प्यातील सलग दुसरा सामना जिंकला आहे.**

**नवी दिल्ली:** भारताने नामिबिया संघावर टी–२० वर्ल्डकप सामन्यात तब्बल ९३ धावांनी दणदणीत विजय मिळवला आहे. यासह भारतीय संघाने टी–२० वर्ल्डकप इतिहासातील आपला सर्वात मोठा विजय नोंदवला आहे. या सामन्यात टीम इंडियाने दोन्ही डावांमध्ये चांगली कामगिरी करत सामना सहज आपल्या नावे केला. हार्दिक पंड्याने या सामन्यात अष्टपैलू कामगिरी करत चमकदार कामगिरी केली. तर फलंदाजीत इशान किशन व संजू सॅमसनने संघाला चांगली सुरूवात करून दिली. तर भारताच्या गोलंदाजांनी टीम इंडियाला पुन्हा एकदा सामना जिंकून दिला आहे.

नामिबिया संघाला पराभूत करत भारताने टी–२० विश्वचषक २०२६ मधील सलग दुसरा सामना जिंकत सुपर–८ साठी आपला मार्ग अधिक सुकर केला आहे. दोन्ही सामन्यांमध्ये भारताच्या गोलंदाजांनी चमकदार कामगिरी केली आहे. तर नामिबियाने सलग दुसरा सामना गमावला आहे.

भारताने दिलेल्या २१० धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना नामिबियाने सावध फलंदाजी करत सुरूवात केली. सलामीवीर स्टीनकॅम्प व फ्रायलिंक यांनी ३३ धावांची भागीदारी रचली. यानंतर फ्रायलिंकला अर्शदीपने बाद केल्यानंतर स्टीनकॅम्प व लॉफ्टीइटन यांनी ३४ धावांची भागीदीरी रचली. पण वरूणने येताच पहिल्या चेंडूवर स्टीनकॅम्पला क्लीन बोल्ड केल्यानंतर नामिबियाने झटपट विकेट्स गमावले. स्टीनकॅम्प २९ धावा तर फ्रायलिंक २२ धावा करत बाद झाले. तर लॉफ्टीईटनने १३ धावा केल्या. तर कर्णधार गेराहार्ड इरॅस्मसला १८ धावांवर माघारी परतावं लागलं, ज्याने २ षटकार लगावत दणक्यात सुरूवात केली होती.पहिल्या ४ फलंदाजांनी चांगली सुरूवात केली, पण भारताच्या गोलंदाजीसमोर ते मोठी खेळी करू शकले नाहीत. भारताकडून या सामन्यात मिस्ट्री स्पिनर वरूण चक्रवर्तीने सर्वाधिक ३ विकेट्स, तर हार्दिक पंड्या व अक्षर पटेल यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेतल्या. तर अर्शदीप सिंग, शिवम दुबे व बुमराह यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.



### भारताच्या विजयानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला

सगळ्यांसाठी हा खूप चांगला सामना होता. ही खेळपट्टी फलंदाजीसाठी सोपी नव्हती, पण इशान आणि संजू यांनी दिलेल्या आक्रमक सुरुवातीमुळे ती सोपी वाटू लागली. त्यानंतर दोन–तीन झटपट विकेट्स गेल्यानंतर शिवम आणि हार्दिक यांनी उभारलेली भागीदारी अत्यंत कौतुकास्पद होती. सूर्यकुमार यादव भारताच्या सर्वात मोठ्या विजयानंतर काय म्हणाला? भारताच्या विजयानंतर कर्णधार सूर्यकुमार यादव म्हणाला, ङ्कसगळ्यांसाठी हा खूप चांगला सामना होता. ही खेळपट्टी फलंदाजीसाठी सोपी नव्हती, पण इशान आणि संजू यांनी दिलेल्या आक्रमक सुरुवातीमुळे ती सोपी वाटू लागली. त्यानंतर दोन–तीन झटपट विकेट्स गेल्यानंतर शिवम आणि हार्दिक यांनी उभारलेली भागीदारी अत्यंत कौतुकास्पद होती.



# श्रीलंकेचा ओमानवर १०५ धावांनी दणदणीत विजय

## शनाका–रत्नायके ठरले विजयाचे हिरो

**दिल्ली–**श्रीलंका संघाने टी–२० विश्वचषक २०२६ मधील आतापर्यंतचा सर्वात मोठा विजय मिळवत ओमानला पराभूत केलं आहे. श्रीलंका व ओमान यांच्यात टी–२० विश्वचषक २०२६ मधील पल्लेकले येथे सामना खेळवला गेला. या सामन्यात श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी सर्वात मोठा विजय नोंदवला. श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना २० षटकांत २२५ धावा केल्या. तर प्रत्युत्तरात ओमानचा संघ २० षटकांत ९ बाद १२० धावाच करू शकला.

श्रीलंकेचा हा टी–२० विश्वचषक २०२६ मधील हा सलग दुसरा विजय आहे. ओमानवर श्रीलंकेने १०५ धावांनी मोठा विजय नोंदवल्यानंतर संघाला गुणतालिकेत नेट रन रेटमध्येदेखील मोठा फायदा होणार आहे. याशिवाय सलग दोन सामने जिंकत संघाने सुपर–८ चा मार्ग सुकर केला आहे. तर ओमान संघाला सलग दुसरा पराभव पत्करावा लागला आहे. त्यामुळे सुपर–८ चं त्यांचं स्वप्न धुळीस मिळालं आहे.

श्रीलंकेने दिलेल्या २२६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना ओमानची सुरूवात खूप खराब झाली. संघाचा कर्णधार व स्फोटक फलंदाज जतिंदर सिंग १ धाव करत बाद झाला. वसीम अलीने २७ धावांची खेळी केली. तर मोहम्मद नदीमने अर्धशतकी खेळी केली. याशिवाय ओमानचे सर्व फलंदाज श्रीलंकेच्या गोलंदाजीसमोर फेल झाले. मोहम्मद नदीम शेवटपर्यंत नाबाद राहत त्याने संघासाठी ५६ चेंडूत ३ चौकार व एका षटकारासह ५३ धावांची खेळी केली. नदीमचं हे आंतरराष्ट्रीय इतिहासातील पहिलं अर्धशतक होतं. श्रीलंकेकडून चमीरा व तीक्ष्णा यांनी प्रत्येकी २–२ विकेट्स घेतल्या. तर वेलाल्गे, मेंडिस, व दुशान हेमंता यांनी प्रत्येकी १–१ विकेट्स घेतल्या.

श्रीलंकेने प्रथम फलंदाजी करताना धावांचा डोंगर उभारला. ओमानने गोलंदाजीला सुरूवात चांगली केली, पण रत्नायके,कुसल मेंडिस व दासुन शनाका यांनी वादळी फलंदाजी केली. श्रीलंकेचे दोन्ही सलामीवीर लवकर बाद होत माघारी परतले. यानंतर पवन रत्नायकेने २८ चेंडूत ८ चौकार व एका षटकारासह ६० धावांची उत्कृष्ट खेळी केली. तर दासुन शनाकाने १९ चेंडूत विक्रमी अर्धशतकी खेळी केली, तर २० चेंडूत त्याने २ चौकार व ५ षटकारांसह ५० धावा केल्या. तर कुसल मेंडिसने एका टोकाकडून मैदानावर राहत ४५ चेंडूत ७ चौकारांसह ६१धावा करत संघाचा डाव सावरला होता. तर कुसल मेंडिसने १९ धावांची झटपट खेळी करत २२५ धावा केल्या.

### फुटबॉलच्या देशाचा क्रिकेटमध्ये डंका! इटलीचा नेपाळवर ऐतिहासिक विजय

दिल्ली–इटलीचा संघ पहिल्यांदाच टी–२० वर्ल्डकप स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरला आहे. पण इटलीच्या खेळाडूंनी आपल्या कामगिरीने सर्वांची मनं जिंकली आहेत. भारतात पहिल्यांदाच खेळण्यासाठी आलेल्या इटलीच्या खेळाडूंनी दाखवून दिलं आहे की, आम्ही ही कोणापेक्षा कमी नाही. टी–२० वर्ल्डकप २०२६ स्पर्धेतील १७ वा सामना इटली आणि नेपाळ या दोन्ही संघांमध्ये पार पडला. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर पार पडलेल्या सामन्यात इटलीने नेपाळवर १० गडी राखून आणि ४४ चेंडू शिल्लक ठेवून दमदार विजय मिळवला आहे.

या सामन्यात इटलीने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. हा निर्णय इटलीच्या गोलंदाजांनी योग्य ठरवला. ज्या संघाने इंग्लंडसारख्या बलाढ्य संघाला घाम फोडला होता, त्या संघावर इटलीचा संघ भारी पडला. पहिल्या डावात फलंदाजी करताना नेपाळचा संपूर्ण डाव १९.३ षटकात १२३ धावांवर आटोपला. नेपाळकडून फलंदाजी करताना सलामीला आलेल्या आसिफ शेखने २० धावांची खेळी केली. तर कर्णधार रोहित पौडेलने २३ धावा केल्या. दिपेंद्र सिंग ऐरीने १७ धावा केल्या. तर आरिफ शेखने २७ धावा केल्या. शेवटी करणने १८ धावांचे योगदान दिले. पण नेपाळचा डाव १२३ धावांवर आटोपला.

इटलीच्या गोलंदाजांनी या सामन्यात अप्रतिम गोलंदाजी केली. २० षटकं टाकण्यासाठी इटलीच्या कर्णधाराने ६ गोलंदाजांचा वापर केला. इटलीकडून बेंजामीन मनेंटीने ४ षटकात ९ धावा खर्च करून २ गडी बाद केले. तर क्रिशन कालुगामगेने ४ षटकात १८ धावा खर्च करून ३ गडी बाद केले. तर अली हसन, जेजे स्मट्स आणि जसप्रीत सिंग यांनी प्रत्येकी १–१ गडी बाद केला.

# टी–२० वर्ल्ड कप २०२६ पॉइंट्स टेबलमध्ये खळबळ!

दिल्ली–आयसीसी टी–२० वर्ल्डकप २०२६ जसजसा रंगात येत आहे, तसतशी गुणतालिकेतील चुरस अधिकच वाढत आहे. काही संघांनी सुरुवातीलाच दमदार कामगिरी करत आपले वर्चस्व सिद्ध केले आहे, तर काही बलाढ्य संघांवर दबावाचे सावट दिसू लागले आहे. १२ फेब्रुवारीपर्यंतची स्थिती अनेक संघांसाठी आशादायी तर काहींसाठी चिंताजनक ठरली आहे.ग्रुप अ : भारत–पाकिस्तान लढतीकडे सर्वांचे लक्ष

ग्रुप अ मध्ये पाकिस्तानने दोन सामन्यांत दोन विजय मिळवत ४ गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. त्यांचा नेट रनरेटही मजबूत असल्याने त्यांना आघाडी मिळाली आहे. भारताने पहिल्या सामन्यात विजय मिळवत २ गुणांची कमाई केली असून तो दुसऱ्या स्थानावर आहे. आता टीम इंडियाचा पुढील सामना नामिबियाविरुद्ध आहे. हा सामना मोठ्या फरकाने जिंकल्यास भारत टेबलमध्ये अव्वल स्थानाच्या शर्यतीत आघाडी घेऊ शकतो. नीदरलँड्सनेही २ गुण मिळवत स्पर्धेत आपली उपस्थिती दाखवली आहे. मात्र अमेरिका आणि नामिबिया अद्याप पहिल्या विजयाच्या शोधात आहेत. त्यामुळे या गटात भारत–पाकिस्तान महामुकाबलाच 'ग्रुप टॉपर' ठरवणारा ठरू शकतो.

ग्रुप अ गुणतालिका

पाकिस्तान – २ सामने, २ विजय, ४ गुण
भारत – १ सामना, १ विजय, २ गुण
नीदरलँड्स – २ सामने, १ विजय, २ गुण
नामिबिया – १ सामना, ० विजय, ० गुण
अमेरिका – २ सामने, ० विजय, ० गुण

ग्रुप ँ : श्रीलंकेची धडाकेबाज कामगिरी

ग्रुप ँ मध्ये श्रीलंकेने ओमानवर १०५ धावांनी भव्य विजय मिळवला. प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेने २० षटकांत २२५ धावांचा डोंगर उभा केला, जो या स्पर्धेतील आतापर्यंतचा सर्वात मोठा स्कोर आहे. प्रत्युत्तर ओमानला २० षटकांत १२० धावांवरच रोखण्यात आले.

आयर्लंड आणि ओमानसाठी मात्र पुढील मार्ग कठीण झाला आहे.ग्रुप ँ गुणतालिका–

श्रीलंका – २ सामने, २ विजय, ४ गुण
ऑस्ट्रेलिया – १ सामना, १ विजय, २ गुण
झिम्बाब्वे – १ सामना, १ विजय, २ गुण
आयर्लंड – १ सामना, ० विजय, ० गुण
ओमान – १ सामना, ० विजय, ० गुण

ग्रुप ण : वेस्ट इंडिजची जोरदार पुनरागमन

### ग्रुप अ : भारत–पाकिस्तान लढतीकडे सर्वांचे लक्ष

ग्रुप ण मध्ये वेस्ट इंडिजने इंग्लंडवर मात करत अव्वल स्थान मिळवले आहे. स्कॉटलंडनेही सलग दोन विजय मिळवत ४ गुणांसह मजबूत स्थिती निर्माण केली आहे. इंग्लंड तिसऱ्या स्थानावर घसरला असून त्यांच्यावर पुढील सामन्यांचा दबाव वाढला आहे. नेपाळ आणि इटलीला अजून गुणतालिकेत वर येण्यासाठी कडवी झुंज द्यावी लागणार आहे.

ग्रुप ण गुणतालिका

वेस्ट इंडिज – २ सामने, २ विजय, ४ गुण
स्कॉटलंड – २ सामने, २ विजय, ४ गुण
इंग्लंड – २ सामने, १ विजय, २ गुण
नेपाळ – १ सामना, ० विजय, ० गुण
इटली – १ सामना, ० विजय, ० गुण

ग्रुप  : अफगाणिस्तान अडचणीत

ग्रुप  मध्ये न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिका यांनी प्रत्येकी दोन विजय मिळवत सुपर ८ कडे भक्कम पाऊल टाकले आहे. अफगाणिस्तानला सलग दोन पराभवांचा सामना करावा लागला आहे. त्यातील एक सामना डबल सुपर ओव्हरपर्यंत रंगला होता. आता त्यांच्यासाठी पुढील फेरी गाठणे अत्यंत कठीण झाले आहे. कॅनडा आणि यूएई देखील तळाशीच आहेत.

# राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत मनमाडचा डंका सुवर्णपदकासह तीन पदकांची कमाई

नाशिक–उत्तर प्रदेशातील मोदी नगरात नाशिक जिल्ह्यातील मनमाडच्या खेळाडुंनी आपल्या कामगिरीचा डंका वाजविला आहे. मनमाडच्या खेळाडुंकडून अपेक्षेप्रमाणे कामगिरी झाली आहे. मोदी नगर येथे सुरू असलेल्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेमध्ये मनमाडचे खेळाडू चांगली कामगिरी करतील, असा विश्वास प्रशिक्षक आणि व्यवस्थापकांनी केला होता. त्याप्रमाणे मनमाडच्या खेळाडुंनी एक सुवर्णपदक, रौप्यपदक आणि कांस्यपदकाची नोंद केली आहे.

महाराष्ट्रात वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात आपला दबदबा निर्माण करणाऱ्या नाशिक जिल्ह्यातील मनमाडने पुन्हा एकदा राष्ट्रीय पातळीवर आपल्या कामगिरीचा ठसा उमटविला आहे. उत्तर प्रदेशातील मोदीनगर येथे ४ ते १४ फेब्रुवारी या कालावधीत राष्ट्रीय युथ ज्युनिअर आणि सिनिअर वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप सुरु आहे. या स्पर्धेसाठी निवडण्यात आलेल्या महाराष्ट्राच्या संघात मनमाडच्या सहा खेळाडुंचा समावेश आहे. मनमाडसाठी ही गौरवास्पद बाब मानली जाते.

वेटलिफ्टिंगसारख्या काहीशा त्रासदायक खेळाकडे मुलांना आणि त्यांच्या पालकांना आकर्षित करणे, खरोखरच दिव्य मानावे लागेल. त्यातही असे प्रयत्न मनमाडसारख्या ग्रामीण भागात होत असतील तर त्यांच्या या प्रयत्नांना निश्चितच दाद द्यावयास हवी. प्रतिकूल परिस्थितीत वेटलिफ्टिंग हा क्रीडा प्रकार मनमाडमध्ये रुजविणे आणि तो बहरात आणणे, अशी कामगिरी प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी केली आहे.

अनेक वर्षांच्या कठीण परिस्थितीनंतर मनमाडमधील खेळाडू वेटलिफ्टिंग या क्रीडा प्रकारात राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय



पातळीवर चमकदार कामगिरी करु लागले आहेत. राष्ट्रकुल, एशियाड यासारख्या स्पर्धामध्ये नजीकच्या भविष्यात मनमाडच्या वेटलिफ्टरने पदक मिळविल्यास त्यात आश्चर्य वाटण्यासारखेच काहीच नाही.

मनमाडच्या खेळाडुंनी आपली दैदिप्यमान कामगिरी मोदी नगर येथील राष्ट्रीय युथ ज्युनिअर आणि सिनिअर वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप स्पर्धेतही सुरु ठेवली आहे.. या स्पर्धेसाठी मनमाडच्या सहा खेळाडूंची महाराष्ट्र संघात निवड झाली. त्यात आतरराष्ट्रीय खेळाडू साईराज परदेशी, आकांक्षा व्यवहारे, राष्ट्रीय पदक विजेते कृष्णा व्यवहारे, आनंदी सांगळे, साहिल जाधव, श्रावणी पुरंदरे यांचा समावेश आहे. भारतातील विविध राज्यातील ५५० खेळाडू पुरुषांच्या आठ आणि महिलांच्या आठ विविध वजनी व वयोगटात सहभागी झाले आहेत.

युथ ज्युनिअर विभागात ७१ किलो वजन गटात मनमाडच्या जय भवानी व्यायामशाळा आणि वागदर्डी विद्यालयाच्या साहिल जाधवने १२२ किलो स्नॅच आणि १५१ किलो क्लीन जर्क असे एकंदर २७३ किलो वजन उचलून चुरशीच्या लढतीत सुवर्णपदक पटकाविले. मनमाडच्याच छत्रे विद्यालयाची आनंदी सांगळे हिने ७७ किलो युवा ज्युनिअर गटात ८२ किलो स्नॅच ९६ किलो क्लीन जर्क १७८ किलो वजन उचलून रौप्य पदक मिळविले. तिचे सुवर्णपदक अवघ्या एक किलोने हुकले. ६५ किलो वजन गटात मनमाडच्या जय भवानी व्यायामशाळा आणि जळगाव (निंबायती) येथील गो. य. पाटील विद्यालयाच्या कृष्णा व्यवहारेने ११८ किलो स्नॅच व १४० किलो क्लीन जर्क असे एकंदर २५८ किलो वजन उचलून चुरशीच्या लढतीत कांस्यपदक पटकाविले. मनमाडच्या खेळाडुंना प्रशिक्षक प्रवीण व्यवहारे यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

# आर्यभट्ट गणित परीक्षेत लाहोटी विद्यालयाचे यश, अव्वल १०० विद्यार्थ्यांमध्ये पटकावले मानाचे स्थान






**लातूर/प्रतिनिधी :** सीबीएससी बोर्डातर्फे घेण्यात येणाऱ्या आर्यभट्ट गणित चॅलेंज २०२५ या स्पर्धेत लातूर येथील राजा नारायणलाल लाहोटी विद्यालयाचा इयत्ता दहावीचा विद्यार्थी चि. गोवर्धन गोविंद भेंडेकर याने सीबीएससी पुणे विभागातून प्रथम शंभर विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता यादीमध्ये स्थान पटकावले आहे.

या यशाबद्दल शाळेचे चेअरमन श्री. आनंद लाहोटी, प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू, रजिस्ट्रार प्रवीण शिवणगीकर, मनोहर कबाडे,अरुल सेल्वी यांनी गोवर्धन चे अभिनंदन व कौतुक केले आहे.

या परीक्षेचा उद्देश विद्यार्थ्यांची चिकित्सक विचारशक्ती आणि तार्किक विचारकौशल्ये विकसित करणे व गणिती संकल्पना वास्तविक जीवनातील परिस्थितींमध्ये लागू करण्यास प्रोत्साहन देणे असा असतो. या परीक्षेसाठी गणित विभागातील उमा नीला, योगेश महाजन, वर्षा पाटणकर या शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

# एकात्म मानव दर्शन विचाराने भारत विश्वगुरु होण्यापूर्वी विश्वमित्र होईल : प्रकाश पाठक

**लातूर/प्रतिनिधी :** संपूर्ण जगाला आज विध्वंसाची भीती आहे. मात्र, लढू नका हे जगाला पटवून देईल तेव्हा भारत विश्वगुरू होईल आणि एकात्म मानव दर्शन विचाराने आपला भारत देश विश्वगुरु होण्यापूर्वी विश्वमित्र होईल, असे प्रतिपादन नाशिकच्या स्वामी विवेकानंद केंद्राचे सहसंचालक सीए प्रकाश पाठक यांनी केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ, लोणेरे व नवनिर्माण प्रतिष्ठान, लातूरच्या संयुक्त विद्यमाने लातुरात आयोजित करण्यात आलेल्या नवनिर्माण व्याख्यानमाला - २०२६ चे प्रथम पुष्प बुधवारी सायंकाळी सीए प्रकाश पाठक यांनी एकात्म मानव दर्शन या विषयावर गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष सुशीलदादा वाजपायी हे होते. मंचावर नवनिर्माण प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रवीण सरदेशमुख, कार्यवाह अशोक शिवणे , प्राचार्य डॉ. विक्रम माने , प्राचार्य रविंद्र शेंडगे ,शैलेश कुलकर्णी, आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सीए प्रकाश पाठक यांनी अतिशय अभ्यासपूर्ण आणि उपस्थितांना आपल्या ओघवत्या वाणीने अक्षरशः मंत्रमुग्ध केले. विकास या शब्दाचा स्थानिक पातळीपासून ते आंतरराष्ट्रीय पातळीपर्यंतचा शब्दप्रयोग नेमका काय असतो, हे त्यांनी उत्कृष्टरित्या समजावून सांगितले. विकासाला सगळी परिमाणे आपण आर्थिक लावत असतो. विकास हा या एकाच मुद्द्यावर विसंबून नसतो. तरीही विकासाची मूलभूत उद्दिष्ट्ये समानार्थाने वापरात आणली जातात. आपल्या व्याख्यानात प्रकाश पाठक यांनी विविध पैलूंवर प्रकाश टाकला. पंडित दीनदयाळ यांचा विचार हा वैश्विक कल्याणाचा विचार आहे. समग्रपणे, समरसतेने, समृद्धतेसाठी केलेले चिंतन हे कल्याणासाठी केले जाते. एकात्म म्हणजे समग्र सृष्टीचा विचार होय. यात मानव, प्राणी, पक्षी, पर्यावरण, निसर्ग या सर्वांचा विचार होय. व्यक्ती, कुटुंब, समाज, सृष्टी, परमेष्टी म्हणजे समग्रता. विचार हा एका वर्तुळाभोवती केंद्रभूत करू नका. प्रत्येक घटकाचा वेगवेगळा विचार करावा. दुसऱ्याचा विचार करण्याचे चिंतन हे भारतीय समाजाचे लक्षण आहे. समाजात प्रेम, आदर वाढावावा, दुसऱ्याचा विचार करण्याची वृत्ती वाढवावी म्हणजेच एकात्म मानव दर्शन होय. एकसंघ, समरस, एकात्म समाजाची निर्मिती करणे आवश्यक आहे. मनुष्य जीवनाचा, मूल्यांचा विचार करून प्रगती झाली पाहिजे, असेही त्यांनी सांगितले.

सुशीलदादा वाजपायी यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना एकात्म मानव दर्शनाचा आशय खूप मोठा असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अशोक शिवणे यांनी केले. प्रास्तविकात त्यांनी प्रतिष्ठानच्या माध्यमातून आतापर्यंत राबविण्यात आलेल्या व्याख्यानमालेचे तसेच अन्य उपक्रमांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते भारतमाता आणि पंडित दीनदयाळ उपाध्याय यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कांचन तोडकर यांनी वैयक्तिक पद्य सादर केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन महेंद्र जोशी यांनी केले.

## आशियाना बंगल्यावर माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते

# काँग्रेस आघाडीच्या विजयी उमेदवारांचा सत्कार

### औसा निलंगा उदगीर येथील नवनिर्वाचित सदस्यांची उपस्थिती







**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते बुधवारी आशियाना बंगल्यावर काँग्रेस व आघाडीचे लातूर जिल्हा परिषद सदस्य तसेच पंचायत समिती सदस्यांचा तसेच लातूर ,औसा, उदगीर, निलंगा इतर पंचायत समित्यांच्या निवडणुकीत विजयी झालेल्या काँग्रेस आघाडीच्या उमेदवारांचा सत्कार करण्यात आला तत्पूर्वी आशियाना बंगल्यावर सर्व विजयी उमेदवारांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आशीर्वाद घेवून सन्मान केला दुसऱ्या दिवशीही आशियाना निवासस्थान कार्यकर्ते पदाधिकारी नवनिर्वाचित सदस्यांनी हाऊस फुल्ल झालेले दिसत होते

**नूतन सदस्यांनी जनतेच्या कामाला प्राधान्य द्यावे- माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे आवाहन**

यावेळी माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख देशमुख यांनी सर्व विजयी उमेदवारांचे अभिनंदन करून नव्या जबाबदारीसाठी शुभेच्छा दिल्या तसेच जनतेने दिलेल्या विश्वासाला न्याय देत विकासकामांना प्राधान्य द्यावे असे आवाहन राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांनी या निवडणुकीत काँग्रेस पदाधिकारी कार्यकर्ते यांनी केलेल्या जिद्दीचे आणि मेहनतीचे कौतुक करत त्यांचे आभार व्यक्त केले

यावेळी राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील काँग्रेसचे माजी अध्यक्ष श्रीशैल्य उटगे, उदयसिंह देशमुख औसा काँग्रेस तालुकाध्यक्ष किरण बाबळसुरे नूतन जिल्हा परिषद सदस्य सौ सोनाली थोरमोटे पाटील (पाखर सांगवी) सईताई गोरे, (आशिव) जिल्हा परिषद सदस्य तानाजी जाधव, (खरोसा) शाम भोसले (मातोळा) सौ शालिनीताई चव्हाण (लामजना)यांच्यासह यांच्यासह पंचायत समिती सदस्य सर्वश्री किशोर काळे अवजाळे (भादा) वैशाली घोडके (मातोळा) अभिजित देशमुख ( तळणी) अंजुनबी कारभारी (लामजना) पंचफुलाबाई घोडके ( लोदगा) सुनंदा स्वामी (चिंचोली ब) गुरुनाथ गवळी (अंकोली) यांच्यासह जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अँड प्रमोद जाधव, मांजरा साखर कारखान्याचे उपाध्यक्ष अशोक काळे, रामदास चव्हाण, हरिराम कुलकर्णी,प्रमोद कुलकर्णी, अजित काळदाते, प्रताप शिंदे, बाळासाहेब कदम, विकास देशमुख, बालाजी साळुंखे चांदपाशा इनामदार संभाजीराव सुळ यांच्यासह कोंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते विविध संस्थांचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**नूतन महापौर जयश्री सोनकांबळे उपमहापौर स्नेहल उटगे यांची आशियाना निवासस्थानी भेट**

यावेळी लातूरच्या नूतन महापौर जयश्री सोनकांबळे उपमहापौर स्नेहल उटगे यांनी आशियाना निवासस्थानी माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांची भेट घेवून आभार मानले आशिर्वाद घेतले यावेळी दिलीपराव देशमुख यांनी लातूर शहराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण प्रयत्न करावे यासाठी आवश्यक माझं सहकार्य राहील असे सांगून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.


# दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे शैक्षणिक सहलीचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** दि.११ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयाच्या प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र विभागातर्फे एम.एस्सी. व बी.एस्सी.च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल चाकूर येथील मधुमक्षिका पालन केंद्र येथे गेली होती.या सहलीचे आयोजन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे व विभाग प्रमुख डॉ.रवी सोळुंके यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते.शैक्षणिक सहलीचे समन्वयक प्राणीशास्त्र पदव्युत्तर समन्वयक डॉ.अमोल ठोसर होते. तसेच प्रा.डी. एस. धरणे व प्रा. मनाली आगलावे उपस्थित होत्या.




सदरील सहलीदरम्यान विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनाचे तंत्र,जीवनचक्र, मधुमक्षिकांचे आरोग्य आणि त्यातून मिळणाऱ्या विविध उत्पादनांविषयी मार्गदर्शन करण्यात आले.आदित्य पाटील यांनी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रदर्शन करून मधुमक्षिका पालन कसे करावे, मधुमक्षिका घरटे कसे व्यवस्थापित करावे आणि मधुमक्षिकांपासून मिळणाऱ्या मध व इतर उत्पादनांचा योग्य उपयोग कसा करावा हे सविस्तर सांगितले.याशिवाय मधुमक्षिका पालन केंद्राचे प्रमुख कृषी भूषण दिनकर पाटील यांनीही विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनातील व्यावहारिक अडचणी, जैवविविधतेवरील परिणाम, तसेच आर्थिक संधी याबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष निरीक्षण केले आणि विविध प्रश्न विचारून सखोल माहिती मिळवली.ही शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी फक्त थेट अनुभव घेण्यापुरती नव्हती, तर प्राणीशास्त्र व मत्स्यशास्त्र क्षेत्रातील व्यावहारिक ज्ञान वाढविण्यासाठी आणि संशोधन क्षमता विकसित करण्यासाठी उपयुक्त ठरली. सहलीत सहभागी विद्यार्थ्यांना मधुमक्षिका पालनाबाबत सखोल समज आली व भविष्यातील प्राणिशास्त्र संशोधनासाठी महत्त्वपूर्ण अनुभवही आला.

# शिवजयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव, जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते पाळणा, रक्तदान शिबीर, बुद्धीबळस्पर्धा होणार




**लातूर/प्रतिनिधी :** प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी छत्रपती शिवाजी महाराज सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने शिवजयंती विविध लोकोपयोगी कार्यक्रमाने साजरी होणार असून त्याची सुरुवात शनिवारी (दि.१४) भव्य रक्तदान शिबीराने होणार आहे. राजर्षी शाहू महाविद्यालय राष्ट्रीय सेवा योजना व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती यांच्या वतीने चंद्रनगर परिसरात असलेल्या राजर्षी शाहू महाविद्यालयात हे शिबीर सकाळी ९ वाजता सुरू होणार आहे. शनिवार (दि.१५) रोजी विविध गटांत बुध्दीबळ स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विजेत्यांना रोख बक्षीस, प्रशस्तीपत्र व स्मृतीचिन्हाने गौरविण्यात येणार आहे. स्पर्धेसाठी प्रवेश मोफत आहे. अष्टविनायक मंदिराशेजारी असलेल्या आर.एन. मोटेगावकर विद्यालयात या स्पर्धांना सकाळी दहा वाजेपासून सुरुवात होईल. शिवजयंतीदिनी १९ फेब्रुवारी रोजी पाळणा महोत्सव साजरा होईल. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांच्या हस्ते व विविध महिला अधिकारी यांच्या उपस्थितीत रात्री १२ वाजता बाळ शिवबांचा पाळणा जोजावला जाईल. त्तपूर्वी छत्रपती शिवरायांची थोरवी सांगणारा आम्ही जिजाऊंच्या लेकी हा विशेष कार्यक्रम महिला शाहीर सादर करतील. यावेळी हजारोंच्या संख्येत महिला, विद्यार्थीनी व शिवप्रेमींची उपस्थिती राहील. रात्री १२ वाजता शिवरायांच्या जयजयकार करीत पेढे वाटून यावर्षीच्या जन्मोत्सवाची सांगता होईल. या सर्व कार्यक्रमांची जय्यत तयारी झाली असल्याचे समितीच्या वतीने सांगण्यात आले.

# लातूर पोलीसांचे विशेष पथक सक्रिय; डारमंड फाईलमधील १७ वर्षांपूर्वीच्या चोरीच्या गुन्ह्यातील फरार व्यक्तीस जेरबंद

**लातूर/प्रतिनिधी :** लातूर पोलीस दलाकडून प्रलंबित व डारमंड फाईलमध्ये वर्ग करण्यात आलेल्या जुन्या गुन्ह्यांचा सातत्याने आढावा घेऊन आरोपींना न्यायालयासमोर उभे करण्याची मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर गु.र.नं. १३३/२००९ कलम ३७९, २०१ भा.दं. वि. मधील तब्बल १७ वर्षांपासून फरार असलेल्या आरोपीस लातूर पोलीसांच्या विशेष पथकाने अटक करण्यात यश मिळविले आहे.

सदर गुन्ह्यातील फिर्यादीची हिरो होंडा प्लस मोटारसायकल मोटारसायकल चोरीस गेली होती. त्यावरून पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे गु.र.नं. १३३/२००९ कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. तपासादरम्यान आरोपी व दोन विधिसंघर्षग्रस्त बालकांनी डुप्लिकेट चावीच्या साहाय्याने मोटारसायकल चोरी केल्याचे निष्पन्न झाले होते. तिघांना ताब्यात घेण्यात आले होते.

त्यावेळी सिध्देश्वर ऊर्फ दत्ता (वय ३७ वर्षे, रा. शिवनगर, लातूर, सध्या ह.मु. मंत्रीनगर, लातूर) यास दि. १५/०६/२००९ रोजी अटक करण्यात आली होती. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेदरम्यान तो सतत अनुपस्थित राहत असल्याने प्रकरण सुप्त संचिकेत वर्ग करण्यात आले होते. सदर व्यक्तीने गेल्या १७ वर्षांपासून वास्तव्याचे ठिकाण वारंवार बदलून प्रशासनास गुंगारा दिला होता. अलीकडेच लातूर शहरात असल्याची माहिती अपर पोलीस अधीक्षक यांच्या विशेष पथकास प्राप्त झाली. त्यानुसार वरिष्ठांना कळवून तात्काळ सापळा रचून सदर व्यक्तीस सिध्देश्वर चौक, मळवटी रिंगरोड, लातूर येथून ताब्यात घेऊन पुढील कारवाई करिता पोलीस स्टेशन शिवाजीनगर येथे हजर करण्यात आले. आरोपीस मा. मुख्य न्यायदंडाधिकारी श्री. सतिश एन. पाटील यांनी दि. १८/०२/२०२६ पर्यंत न्यायालयीन कोठडी सुनावली आहे.

लातूर पोलीस दलाकडून यापूर्वीही अशा प्रकारे डारमंड फाईलमधील जुने व प्रलंबित गुन्हे पुनरुज्जीवित करून फरार आरोपींना अटक करण्याची प्रभावी मोहीम राबविण्यात आलेली आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे,अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, उपविभागीय पोलीस अधिकारी लातूर शहर श्री. समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकातील पोलीस अमलदार दत्तात्रय शिंदे व योगेश गायकवाड यांनी यशस्वीरीत्या




# दयानंद वाणिज्य महाविद्यालयात इयत्ता बारावी बोर्डच्या परीक्षा सुरळीत चालू

**लातूर/प्रतिनिधी :** दि.१० फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता बारावी वर्गाच्या परीक्षेला सुरुवात झाली. दयानंद वाणिज्य महाविद्यालय या केंद्रावरती विज्ञान आणि वाणिज्य शाखेच्या विद्यार्थी परिक्षार्थीनी इंग्रजी विषयाची परीक्षा दिली. ही परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडली. दयानंद शिक्षण संस्थेचे शैक्षणिक विकास अधिकारी डॉ .जयप्रकाश दरगड आणि महाविद्यलयाचे प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे परीक्षेसाठी स्वागत केले व त्यांना शुभेच्छा दिल्या.तसेच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनीही विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ देऊन परीक्षेसाठी शुभेच्छा दिल्या.परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी महाविद्यालयाचे प्रशासकीय अधिकारी प्रा.ऋतुजा देशमुख, समन्वयक डॉ.




सुभाष मोरे परीक्षा केंद्रप्रमुख प्रा. सिद्धेश्वर ठाकूर ,कार्यालयीन अधीक्षक श्री. फैयाजखान पठाण , शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर लातूर पोलिसांची व्यापक तयारी

## शांतता समिती बैठकीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याचा निर्धार

**लातूर/प्रतिनिधी:** १२ फेब्रुवारी २०२६ रोजी लातूर पोलीस यांच्या वतीने आगामी विविध धर्मीय सण-उत्सव शांततेत, उत्साहात व निर्विघ्नपणे पार पडावेत यासाठी शांतता समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली. सदर बैठक पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांच्या अध्यक्षतेखाली पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथील मीटिंग हॉलमध्ये पार पडली.

या बैठकीस अपर पोलीस अधीक्षक श्री. मंगेश चव्हाण, जिल्ह्यातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहरातील पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी, विविध शाखांचे प्रभारी अधिकारी तसेच सर्व जाती-धर्मातील प्रतिष्ठित नागरिक, व्यापारी, समाजसेवक, विविध मंडळे व समित्यांचे अध्यक्ष मोठ्या संख्येने उपस्थित होते.



बैठकीदरम्यान श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती, महाशिवरात्री,जय सेवालाल जयंती, रमजान महिना व रमजान ईद, होळी, धुलीवंदन, रंगपंचमी तसेच इतर साजरे होणारे सर्वधर्मीय सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था स्थितीचा सखोल आढावा घेण्यात आला. संवेदनशील भागांचे विश्लेषण, मिरवणुकांचे मार्ग, धार्मिक स्थळांची सुरक्षा, वाहतूक नियंत्रण, सोशल मीडिया देखरेख व अतिरिक्त बंदोबस्त यासंदर्भात स्पष्ट सूचना देण्यात आल्या. तसेच उपस्थित सर्व शांतता समिती सदस्य व इतर मान्यवर यांच्या अडीअडचणी समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्याबाबत आश्वस्त करण्यात आले.

पोलीस अधीक्षक श्री अमोल तांबे यांनी बैठकीच्या पार्श्वभूमीवर बैठकीस उपस्थित असलेल्या सर्व शांतता समिती सदस्य व इतर मान्यवरांना संबोधित करून लातूर शहर हे सुसंस्कृत, सर्वधर्मसमभाव जपणारे शहर असून महाराष्ट्रामध्ये लातूर शहराची वेगळी सुसंस्कृतपणाची ओळख आहे. त्यामुळे सर्वांनी आपल्या लातूर जिल्ह्याच्या प्रगती व उन्नतीसाठी तसेच लातूरचा सुसंस्कृतपणा अबाधित ठेवण्यासाठी प्रशासनास योग्य असे सहकार्य करून लातूर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेची कठोर अंमलबजावणी होऊन शांतता प्रस्थापित होण्यासाठी सर्वांनी सजगपणे प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

शांतता समितीच्या बैठकीत सर्व धर्मीय प्रतिनिधींनी सण-उत्सव शांततेत व बंधुभावाने पार पाडण्याचा ठाम निर्धार व्यक्त केला. कोणत्याही अफवा, भडकावू संदेश किंवा समाजविघातक प्रवृत्तींना थारा दिला जाणार नाही, असे एकमताने नमूद करण्यात आले. पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे यांनी अध्यक्षीय भाषणात नागरिकांना प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन केले तसेच लातूर पोलीस दल हे सर्व सण-उत्सव कायदा व सुव्यवस्था अबाधित राखून यशस्वीरित्या पार पाडण्यास पूर्णतः सक्षम असल्याचा विश्वास व्यक्त केला.

### पोलीसांकडून करण्यात आलेल्या प्रमुख उपाययोजना.

- संवेदनशील ठिकाणी फिक्स पॉईंट बंदोबस्त.
- जीप पेट्रोलिंग व पायी गस्त वाढविणे.
- गुड मॉर्निंग स्कॉड सतर्क ठेवणे.
- एसआरपीएफ प्लाटून, ९६० पुरुष होमगार्ड व १५० महिला होमगार्ड यांची नेमणूक.
- प्रमुख मशिदी, ईदगाह व कब्रस्तान परिसरात बंदोबस्त.
- वाहतूक नियोजन व पर्यायी मार्गांची आखणी.
- अफवा पसरविणाऱ्यांवर कठोर कारवाई
- सोशल मीडिया विशेष मॉनिटरिंग सेल कार्यरत.
- अवैध मद्यविक्री व इतर गैरप्रकारांवर विशेष मोहिम.
- नाकाबंदी व रात्रीची गस्त वाढविण्यात येणार.
- महिला सुरक्षा पथक सक्रिय करण्यात आले आहेत.
- महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७ (१) (३) अंतर्गत आवश्यकतेनुसार अधिसूचना.
- महत्वाच्या पुतळे, मंदिरे, मशिदी व धार्मिक स्थळांवर विशेष बंदोबस्त.
- डीजे व ध्वनीप्रदूषणासंदर्भात वेळ व ध्वनीमर्यादेचे काटेकोर पालन.

## छत्रपती शिक्षण संस्थेच्या नूतन संचालक मंडळांनी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची घेतली सदिच्छा भेट



**लातूर/प्रतिनिधी:** राज्यातील शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक मिळवलेल्या श्री शिवछत्रपती शिक्षण संस्थेच्या नूतन संचालक मंडळांची नुकतीच निवड करण्यात आली आहे, नूतन कार्यकारणी व पदाधिकाऱ्यांनी आशियाना निवासस्थानी गुरुवारी प्रारंभापासूनचे संस्थेचे सन्माननीय सदस्य तथा राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख साहेब यांची सदीछा भेट घेतली. यावेळी सर्व नूतन पदाधिकारी सदस्य यांचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी अभिनंदन केले आहे यावेळी विविध विषयावर माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख यांच्यासोबत सकारात्मक चर्चा केली नवीन कार्यकारी मंडळाने घटनेतील तरतुदी नुसार एकमताने आदरणीय साहेबांना सन्माननीय सदस्त्वाचे विनंतीपत्र दिले. त्याचा स्वीकार साहेबांनी केला.

यावेळी शिवछत्रपती शिक्षण संस्थेचे नवनिर्वाचित उपाध्यक्ष डॉ अजय जाधव,सहसचिव डॉ शिवाजीराव सुर्यवंशी सहसचिव उद्धवराव पाटील ,संचालक सच्चिदानंद पाटील, संचालक धर्मराज हल्लाळे,संचालक राजेंद्र मालपाणी, संचालिका श्रीमती पाटील विजया भुदेव, संचालक रावसाहेब कावळे, संचालक शिवाजी भोसले संचालक शामराव पाटील संचालक प्रकाश देशमुख, संचालक अमर देशमुख यांचे अभिनंदन करुन माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी यावेळी मार्गदर्शन केले. यावेळी वैभव तळेकर, पल्लवी पाटील, बाजीराव शिंदे,सुरेश कावळे दिपक पाटील आदींची उपस्थिती होती.

# नूतन महापौरांनी घेतला मनपाच्या कामकाजाचा आढावा

## सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने सूचना

**लातूर/प्रतिनिधी:**लातूरच्या नवनिर्मीचित महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे व उपमहापौर स्नेहल उटगे यांनी गुरुवारी (दि.१२) मनपातील अधिकार्यांकडून कामकाजाचा आढावा घेतला. रविवारपासून सुरू होणारी ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रा व शिवजयंतीच्या अनुषंगाने त्यांनी विविध सूचनाही केल्या.

महापौर श्रीमती जयश्री सोनकांबळे, मनपा आयुक्त श्रीमती मानसी व उपमहापौर स्नेहल उटगे यांच्या उपस्थितीत झालेल्या बैठकीत प्रारंभिक अधिकाऱ्यांचा व विभाग प्रमुखांचा परिचय करून देण्यात आला.नूतन महापौर व उपमहापौरांनी मनपाचे कामकाज समजून घेतले. पाणीपुरवठा, पथदिवे, अग्निशमन,आरोग्य तसेच सर्व विभागांची माहिती त्यांनी अधिकाऱ्यांकडून घेतली.

महाशिवरात्री निमित्त रविवार दि.१५ फेब्रुवारी पासून ग्रामदैवत श्री सिद्धेश्वर यात्रेला सुरुवात होत आहे.या यात्रेच्या अनुषंगाने मनपाच्या वतीने केल्या जाणाऱ्या तयारीचा आढावाही महापौरांनी घेतला. यात्रेत मनपाच्या वतीने पाण्याचे टँकर भरून दिले जाते. त्याबाबत माहिती घेतली. यात्रा परिसर व यात्रा मार्गावरील रस्त्यांची दुरुस्ती, पथदिव्यांची दुरुस्ती याबाबतही त्यांनी सूचना केल्या. यात्रा परिसरात गरज पडली तर अग्निशमन दल सेवा तत्पर असावी, असेही महापौरांनी सांगितले. यात्रेच्या अनुषंगाने जे-जे करणे आवश्यक आहे त्या सर्व बाबी प्राधान्याने कराव्यात,असे त्या म्हणाल्या.

दि. १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंती उत्सव साजरा केला जाणार आहे. त्यानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व परिसराची स्वच्छता, आवश्यक तेथे डागडुजी व सुशोभीकरण करण्याच्या सूचना त्यांनी केल्या.



या बैठकीस गट नेते विजयकुमार साबदे,नगर सेवक धोंडिराम यादव, सचिन गायकवाड,अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त वसुधा फड, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे यांच्यासह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानमध्ये चार्ल्स डार्विन यांच्या जयंतीनिमित्त सेमिनारमध्ये विद्यार्थ्यांचा प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** दयानंद विज्ञान महाविद्यालयात दि. १२ फेब्रुवारी २०२६ रोजी चार्ल्स डार्विन यांच्या २१७ वी जयंतीनिमित्त लुमिनार्या व्याख्यानमाले अंतर्गत विशेष सेमिनाराचे आयोजन करण्यात आले. हा कार्यक्रम महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली उत्साहात पार पडला. कार्यक्रमाची सुरुवात विभाग प्रमुख प्रा. अवंती बिडकर यांच्या हस्ते चार्ल्स डार्विन यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. त्यानंतर बी.एस्सी. जैवतंत्रज्ञान द्वितीय वर्षातील विद्यार्थिनी चामे निलाक्षी हिने चार्ल्स डार्विन यांच्या जीवनप्रवास, संशोधन कार्य तसेच जैवविविधता, उत्क्रांती सिद्धांत व जैव-भौगोलिक विभागणी क्षेत्रातील त्यांच्या मोलाच्या योगदानावर सविस्तर सादरीकरण केले.



सादरीकरणात चार्ल्स डार्विन यांनी उत्क्रांतीचा सिद्धांत मांडून आधुनिक जीवशास्त्राची पायाभरणी केली.नैसर्गिक निवड प्रक्रियेमुळे प्रजाती काळानुसार बदलतात, हे त्यांनी सिद्ध केले. बीगल जहाजावरील प्रवासात त्यांनी विविध सजीवांचे निरीक्षण केले आणि 'ऑन द ओरिजिन ऑफ स्पेसिस ' हे महत्त्वाचे पुस्तक लिहिले. त्यांच्या कार्यातून वैज्ञानिक विचारसरणी, तार्किकता व पर्यावरणीय जबाबदारी यांची सांगड घालण्याचा संदेश मिळतो.याप्रसंगी विभागातील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच पदवी व पदव्युत्तर विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## किल्लारी बंधाऱ्याच्या दुरुस्तीसाठी १.८६ कोटींचा निधी:सिंचन क्षेत्राला गती येणार

**औसा/प्रतिनिधी:** औसा तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी दिलासादायक निर्णय घेत शासनाने तेरणा नदीवरील किल्लारी क्र. २ (लातूर पद्धती) बंधाऱ्याच्या यांत्रिकी व विद्युत घटकांच्या दुरुस्तीसाठी १ कोटी ८६ लाख रुपयांच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता दिली आहे. आमदार अभिमन्यू पवार यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा निधी मंजूर झाल्याचे सांगितले जात आहे. धरण सुरक्षितता आणि सुलभ द्वार परिचालनाच्या दृष्टीने ही दुरुस्ती अत्यंत महत्त्वाची मानली जात असून, त्यामुळे परिसरातील शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.किल्लारी क्र. २ बंधारा हा लातूर जिल्ह्यातील किल्लारी क्र. २ गावाजवळ तेरणा नदीवर उभारण्यात आला असून, तो तेरणा धरण स्थळापासून सुमारे २५.०५ कि.मी. अंतरावर आहे. या बॅरेजचा एकूण संकल्पित पाणीसाठा १.३०४ दशलक्ष घनमीटर असून १९४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याची क्षमता आहे. सन २०१५ मध्ये हा प्रकल्प पूर्ण झाला आणि त्याच वर्षी प्रथमच पाणी साठविण्यात आले. त्यानंतर सन २०१९ मध्ये प्रकल्प व्यवस्थापन विभागाकडे देखभाल व द्वार परिचालनासाठी हस्तांतरित करण्यात आला.मात्र प्रकल्प पूर्ण झाल्यापासून बंधाऱ्यातील द्वारे व उच्चालक यंत्रणेची आवश्यक दुरुस्ती झालेली नव्हती.


रोज वाचा ऑनलाईन लातूर समाचार
www.latursamachar.com


### टि.सी.व मार्कमेमो हरवले आहे

निलोफर इकबाल शेख या नावाची जय भारत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, दापका या शाळेची १२ विज्ञान उतिर्ण फेब्रु २०१७ या वर्षाची १२ वी मार्कशीट, १० वी मार्कशीट,१२ वी टी सी हे सर्व कागदपत्रे लातुर निलंगा बस प्रवासात ५/२/२०२६ रोजी हरवले आहे तरी कोणाला सापडल्यास पुढील पत्यावर संपर्क साधावा

**संपर्क**
**निलोफर इकबाल शेख**
**मु पो दापका ता निलंगा**
**मो नं- ९२०९१९६३३४**

### कुंपण ..

पक्ष सोडून जाणारा
दोषी मानतो आपण
करतनाही मान्य का
भक्कमनाही कुंपण

चुकीच्या खडकावर
कसेकरी वृक्षारोपण
पावसाळ्यात उगाचं
करतो अमृत शिंपण

दाणे पाही पक्षी येती
फिरवायं हवीगोफण
लुटून निघाले लुटारु
डोळ्या लावी ढापण

आपलेनक्की चुकले
कधी तरी पहा दर्पण
पक्षनिष्ठांना सांभाळा
खूपकरतात समर्पण

पक्षासाठी राब राबले
कष्ट त्याचे कृष्णार्पण
गोंजारताना रे त्यांना
सोडूनद्यायचे अहंपण

मिडीयावले तयार ते
करी लाईव्ह प्रक्षेपण
प्रति पक्ष वाट पाहतो
डागतील अस्त्रं क्षेपण

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेकडून धरणे सत्याग्रह निवेदन

**लातूर/प्रतिनिधी:** सरकारी व निमसरकारी, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीच्या वतीने राज्य सरकारी मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष बी.बी. गायकवाड, कार्याध्यक्ष महादेव पांचाळ, उपाध्यक्ष आर.एस.तांदळे, महसूल संघटनेचे दत्तात्रय सूर्यवंशी व अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत प्रलंबित विविध मागण्याचे धरणे सत्याग्रह निवेदन लातूर येथील निवासी उपजिल्हाधिकारी यांना देण्यात आले.



सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी, सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी तसेच शिक्षण विभागातील शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मा. मुख्यमंत्री स्तरावर चर्चा करुन निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलव्य करुन देण्यात यावे, दि. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विना अनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना तसेच वस्तीशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा, चतुर्थश्रेणी कर्मचारी व वाहनचालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा, राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा. तसेच पूर्वाश्रमिच्या ग्रामपंचायतींमधील कायम असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे. सर्व सरकारी कर्मचारी/निवृत्तीवेतनधारक/कंत्राटी-रोजंदारी कर्मचारी यांना सर्व महत्वाच्या इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत यासाठी व्यापक स्वास्थ्य विमा योजना लागू करावी. सेवानिवृत्तीचे वय ६० करा. १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी/रोजंदारी/अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा. १०. एकवेळची वाव म्हणून प्रतिक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्वावरील नियुक्त्या द्या. अनेक विभागात लिपिक संवर्गातील कर्मचाऱ्यांना प्रदिर्घ काळ कार्यात्मक उच्च पदाच्या पदोन्नतीपासून वंचित रहावे लागते. त्यामुळे अपेक्षित वेतन वृध्दीचा लाभ संबंधितांना मिळत नाही. यावावत सुधारित धोरण करण्यात यावे. पीएफआरडीए कायदा रद्द करण्यात यावा व फंड मॅनेजरकडे संचित झालेली रक्कम संबंधित राज्य सरकारला परत करण्यात यावी. सरकारी कर्मचाऱ्यांवर कर्तव्य बजावत असताना होणाऱ्या भ्याड हिंसक हल्ल्यांविरुध्द कडक कारवाई व्हावी यासाठी आयपीसी कलम ३५३ मध्ये दुरुस्ती करुन कलम ३५३ अजामिनपात्र करण्यात यावे. सर्व संवर्गातील रिक्त पदे भरण्या संदर्भातील कार्यवाहीचा वेग वाढवावा. चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना नियुक्ती देण्यासंदर्भातील १९८१ च्या शासन निर्णयाची पुनर्स्थापना करा.

ज्या विभागाने सेवाभरती नियम व आकृतीबंधास अद्याप शासन मंजुरी घेतलेली नाही, त्यांना अशी मंजुरी विहित मुदतीत घेण्यासंदर्भात सूचना देण्यात याव्यात. शिक्षकांचे जीवन उध्वस्त करणारा १५ मार्च २०२४ चा संच मान्यतेचा शासन आदेशाबाबत पुनर्विचार करण्यात यावा. नवीन राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा पुनर्विचार करा अशा कर्मचाऱ्यांच्या मागण्या आहेत.

रास्त प्रलंबित प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचा दृष्टीकोन सकारात्मक दिसून आलेला आहे. आपण संवेदनशील असल्यामुळे, संघटनांनी मांडलेले प्रश्न आपण नेहमीच आपुलकीने समजून घेतलेले असले तरी, काही जिव्हाळयाच्या प्रश्नांबाबत निर्णयासाठी आंदोलन, निदर्शने करण्याची वेळ राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेसह विविध संघटनांवर येऊ नये, अशी सर्व कर्मचाऱ्यांची विनंती आहे.


निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
सितारी विमा सेवा केंद्र
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
जमीरोद्दीन सितारी
चेअरमन क्लब मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396



Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade   Mo. 9422472502,   RNI 47034/64,   POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26

हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे.   मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२   आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६